दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक
बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१२८ | मंगळवार दि.२८ जुलै २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### कर्जमाफी यादीत नाव नाही शेतकऱ्याची आत्महत्या

यवतमाळ : राज्य सरकारने नुकताच कर्जमाफी झालेल्या शेतकऱ्यांची यादी जाहीर केली. ही यादी जाहीर होताच शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. बँकेमध्ये रांगा लावून शेतकरी आपली कर्जमाफी झाली की नाही हे तपासत आहेत. अशामध्येच यवतमाळमधून एक मन सुन्न करणारी घटना घडली. कर्जमाफीच्या यादीमध्ये नाव न आल्याने शेतकऱ्याने आत्महत्या केली. राळेगाव तालुक्यातील भांब गावात ही हृदयद्रावक घटना घडली. राजू बापूराव चुड्डुके (४९ वर्षे) असे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. हा शेतकरी बँकेमध्ये कर्जमाफीच्या यादीमध्ये नाव आले की नाही हे तपासण्यासाठी गेला होता. पण त्याला यादीमध्ये आपले नाव दिसले नाही. त्यामुळे ते नैराश्येत गेले. बँकेतून घरी आल्यानंतर त्यांनी विष प्राशन करून आयुष्य संपविले. त्यांच्या नावावर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे तसेच चार मायक्रो फायनान्स कंपन्यांचे कर्ज असल्याचे बोलल्या जात आहे.

### नेपाळमध्ये भारतीय नोटांना परवानगी

काठमांडू: नेपाळने भारतीय आणि नेपाळी नागरिकांना २०० आणि ५०० रुपयांच्या भारतीय नोटा देशात आणण्याची किंवा बाहेर नेण्याची परवानगी दिली आहे. यामुळे २०१६ च्या नोटाबंदीनंतर लागू असलेली आणि केवळ १०० रुपयांपर्यंतच्या नोटांना परवानगी देणारी जवळपास दशकभराची बंदी संपुष्टात आली आहे. नेपाळ राष्ट्र बँकेने पुन्हा जारी केलेल्या एका सूचनेत म्हटले आहे की, विद्यमान नियमांनुसार भारतीय आणि नेपाळी नागरिक ९ नोव्हेंबर २०१६ रोजी किंवा त्यानंतर जारी केलेल्या २०० आणि ५०० रुपयांच्या भारतीय नोटा, प्रति व्यक्ती २५,००० रुपयांच्या मर्यादेपर्यंत सोबत बाळगू शकतात.आवश्यक नियम तयार केल्यानंतर ११ फेब्रुवारी रोजी नेपाळच्या राजपत्रामध्ये (गॅझेट) प्रकाशित सूचनेद्वारे या तरतुदींची माहिती आधीच देण्यात आली होती; तरीही, नियमांची पुन्हा आठवण करून देण्यासाठी आणि त्यांच्या अंमलबजावणीबाबत स्पष्टता आणण्यासाठी एनआरबीने ही सूचना पुन्हा जारी केली.

### पायउतार झालेल्या प्रधानांचे संसदेत जंगी स्वागत

दिल्ली: कॉक्रोज जनता पार्टीने नीट पेपर लीग प्रकरणी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा देण्यास भाग पाडले. मंत्रीपद सोडल्यानंतर पहिल्यांदाच धर्मेंद्र प्रधान हे संसदेत पोहचले. त्यावेळी संसद भवनच्या गेटवर भाजप आणि एनडीएच्या इतर खासदारांनी धर्मेंद्र प्रधान यांचे जंगी स्वागत केले. यावेळी भाजप आणि सत्ताधारी एनडीएच्या खासदारांनी धर्मेंद्र प्रधान जिंदाबाद अशा घोषणा देखील दिल्या. त्यानंतर त्यांना पाग घालून संसदेत नेण्यात आले. विरोधी पक्ष प्रधानांचा राजीनामा हे सरकारचा पराभव असे चित्र निर्माण करत असताना सत्ताधारी मात्र त्याला एका त्यागाचे स्वरूप देत आहेत. जनतेच्या रेट्याचा आपण सन्मान केला असे चित्र निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. काँग्रेसने पेपर लीग प्रकरणी धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा होत नाही तोपर्यंत चर्चा करण्यात येणार नाही अशी भूमिका घेतली होती.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.२७ जुलै २०२६
आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| **गहू: १६०.०० क्विंटल** | | |
| २,५०० | २,८५० | २,६५८ |
| **ज्वारी/हायब्रिड :५०.५० क्विंटल** | | |
| २,००० | ३,५०० | २,८२३ |
| **मका/लोकल: २०.०० क्विंटल** | | |
| २,३२३ | २,३२३ | २,३२३ |
| **तूर : २.०० क्विंटल** | | |
| ७,६०१ | ७,६०१ | ७,६०१ |
| **उडीद : २.०० क्विंटल** | | |
| ५,००० | ५,००० | ५,००० |
| **बाजरी:५२.०० क्विंटल** | | |
| २,४०० | २,८४० | २,६५७ |
| **मुग: ४१.५० क्विंटल** | | |
| ५,८०० | ५,८१२ | ५,८०६ |
| **सोयाबीन:१.५० क्विंटल** | | |
| ६,६०० | ६,६०० | ६,६०० |
| **हरभरा: १.५० क्विंटल** | | |
| ५,२०१ | ५,२०१ | ५,२०१ |

# शेतकरीहिताच्या योजनात महाराष्ट्राची दमदार कामगिरी

## केंद्राकडून विशेष गौरव; आरकेव्हीवाय निधी खर्चात महाराष्ट्राची बाजी, देशात पहिले मानांकन

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीत महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्रातील कामगिरीचे विशेष कौतुक करण्यात आले. या बैठकीला महाराष्ट्राचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्यासह केंद्र व राज्य शासनातील वरिष्ठ अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. बैठकीत 'राष्ट्रीय कृषी विकास योजना' (आरकेव्हीवाय) अंतर्गत विविध राज्यांच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. यावेळी महाराष्ट्राने योजनेअंतर्गत मिळालेल्या निधीचा वेळेत, नियोजनबद्ध आणि प्रभावी वापर केल्याबद्दल केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी राज्याचे विशेष अभिनंदन केले. या उल्लेखनीय कामगिरीमुळे आरकेव्हीवायचा दुसरा हप्ता मिळवण्यासाठी पात्र ठरणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे.**

केंद्र सरकारने आरकेव्हीवाय अंतर्गत महाराष्ट्राला पहिल्या हप्त्यापोटी ३३५ कोटींचा निधी मंजूर केला होता. या निधीपैकी आवश्यक असलेल्या ७५ टक्के खर्चाची अट राज्याने वेळेत पूर्ण केली. राज्याने सुमारे २६० कोटींचा निधी विविध कृषी विकास योजनांवर नियोजनबद्ध पद्धतीने खर्च केल्याने दुसरा हप्ता मंजूर होण्यासाठी आवश्यक निकष पूर्ण झाले आहेत. यावेळी केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी सार्वजनिक निधीचा



वापर अत्यंत पारदर्शक, परिणामकारक आणि शेतकऱ्यांच्या हितासाठीच केला जावा, यावर भर दिला. निधीच्या वापरावर सातत्याने देखरेख ठेवून प्रत्येक रुपयाचा योग्य उपयोग सुनिश्चित करण्याच्या सूचना त्यांनी सर्व राज्यांना दिल्या. बैठकीत महाराष्ट्र सरकारने पूरग्रस्त शेतकऱ्यांना दिलेल्या तातडीच्या मदतीचाही विशेष उल्लेख करण्यात आला. पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यात अवघ्या पाच दिवसांत थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) पद्धतीने सुमारे १४ हजार कोटींची मदत जमा करण्यात आल्याबद्दल केंद्रीय मंत्र्यांनी राज्य शासनाचे कौतुक केले. तसेच राज्यात राबविण्यात येत असलेल्या शेतकरी ओळखपत्र निर्मिती उपक्रमालाही त्यांनी आदर्श उपक्रम म्हणून गौरविले. बैठकीदरम्यान 'एकीकृत फलोत्पादन विकास अभियान' अंतर्गत सुरू असलेल्या ▶▶ पान २ वर

# नीट खटल्याला 'फास्ट ट्रॅक' कोर्टात कासव गती




नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**नीट पेपर लीक प्रकरणाच्या फास्ट ट्रॅक कोर्टातील सुनावणीच्या पहिल्याच दिवशी सरकारी वकील गैरहजर राहिल्याने न्यायालयाने सुनावणी तहकूब केली. या प्रकरणाच्या जलद सुनावणीच्या अपेक्षांना अतिशय मंद गतीने सुरूवात झाल्याने धक्का बसला असून पुढील तारखेला सुनावणी होणार आहे.**

देशभरात गाजलेल्या नीट पेपर लीक प्रकरणाच्या फास्ट ट्रॅक कोर्टातील सुनावणीला पहिल्याच दिवशी विलंब झाला. सरकारी पक्षाचे वकील न्यायालयात हजर न राहिल्यामुळे न्यायालयाने सुनावणी पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. नीट–यूजी पेपरफुटी रोखण्यासाठी फास्ट ट्रॅक न्यायालयाची स्थापना करणे, हे सरकारचे एक मोठे आश्वासन आहे. या प्रकरणाची पहिली सुनावणी सोमवारी होणार होती. मात्र, पहिल्याच दिवशी अडचण आल्याने सुनावणी ३ ऑगस्टपर्यंत पुढे ढकलण्यात आली. वृत्तानुसार, सुनावणीच्या पहिल्या दिवशी सीबीआयचे वकील हजर राहिले नाहीत. परिणामी, न्यायालयाला नवीन तारीख निश्चित करावी लागली आणि सुनावणी पुढे ढकलण्यात आली. दरम्यान सीबीआयने अटक केलेल्या १३ आरोपींमध्ये दिनेश आणि विकास बिवल यांचा समावेश आहे. पेपरफुटीनंतर उमेदवारांना तो वितरित करण्यात सहभागी असल्याचा ▶▶ पान २ वर

# धर्मेंद्र प्रधानांची विकेट, राज्यांतील तीन मंत्र्यांची फिल्डींग सेट ?

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर आता विद्यार्थी संघटन आक्रमक झाल्या आहेत. प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर या आंदोलनांची धार वाढू लागली आहे. पंजाब, आंध्र प्रदेश, तेलंगणा मधील शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरू लागली आहे.**

या तीनही राज्यांमध्ये भाजपचे शिक्षण मंत्री नाहीत. तीनपैकी दोन राज्यांमध्ये (पंजाब आणि तेलंगणा) भाजपचे विरोधक सत्तेत आहेत. तर एका राज्यात (आंध्र प्रदेश) भाजप मित्रपक्ष म्हणून सत्तेत आहे. पण भाजप सत्तेमधील प्रमुख पक्ष नाही. तिथले शिक्षण मंत्रीदेखील भाजपचे नाहीत.पंजाबमध्ये दोन मोठ्या सरकारी भरती प्रक्रिया वादात सापडल्या आहेत. आपमधील भगवंत मान सरकारला विरोधी बाकांवरील काँग्रेस, भाजप आणि शिरोमणी अकाली दलानं अडचणीत आलं आहे. पंजाबमध्ये पेपर लीक आणि हाय–टेक गोंधळ होत असल्याचा विरोधकांचा आरोप आहे. हरजोत सिंग बैस पंजाबचे शिक्षण मंत्री आहेत. त्यांच्या राजीनाम्यासाठी विरोधक आक्रमक झाले आहेत. आंध्र प्रदेशात मेगा –२०२५ शिक्षक भरतीवरुन राजकीय वाद सुरू आहे. विरोधात असलेल्या वायएसआर काँग्रेसनं भरती प्रक्रियांमधील अनियमिततांवरुन आरोप केले आहेत. त्यांनी शिक्षण मंत्री नारा लोकेश यांचा राजीनामा मागितला आहे. या संपूर्ण प्रकरणाच्या चौकशी न्यायालयाच्या देखरेखीखाली करण्यात यावी, अशी विरोधकांची ▶▶ पान २ वर

# माजलगावच्या भाजप पदाधिकाऱ्यांना मुख्यमंत्र्यांची ॲलर्जी

बीड । प्रतिनिधी

२६ जुलै रोजी राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांचा वाढदिवस संपूर्ण राज्यात व बीड जिल्ह्यात अत्यंत उत्साहात आणि दणक्यात साजरा करण्यात आला. ठिकठिकाणी कार्यकर्त्यांनी त्यांना शुभेच्छा देण्यासाठी फलक (फ्लेक्स) लावले होते. मात्र, यादरम्यान माजलगाव तालुका भाजपच्या वतीने लावण्यात आलेल्या एका फ्लेक्समुळे राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा आणि तर्कवितर्क सुरू झाले आहेत.

माजलगाव तालुक्यात लावण्यात आलेल्या या अभिनंदनाच्या बॅनर्सवर पंकजाताई मुंडे यांचे मोठे फोटो झळकले असले, तरी त्यावर राज्याच्या मुख्यमंत्र्यांचा फोटो पूर्णपणे गायब असल्याचे दिसून आले. पक्षाच्या अधिकृत किंवा तालुका पातळीवरील पदाधिकाऱ्यांच्या बॅनरवरून राज्याच्या मुख्यमंत्र्यांचे छायाचित्र जाणीवपूर्वक ▶▶ पान २ वर

# केंद्र सरकारने शब्द पाळला नाही!

## आंदोलकांवरील गुन्हे अद्याप मागे नाही, कॉकरोच जनता पार्टी आक्रमक



दिल्ली । वृत्तसंस्था

भाजपच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने आंदोलकांवरील पोलीस कारवाई सुरू ठेवून २५ जुलै रोजी केंद्रीय मंत्री जेपी नड्डा आणि जितेंद्र सिंह यांच्यासोबत झालेल्या कराराचे उल्लंघन केल्याचा आरोप सीजेपीने केला आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर सीजेपीने आपले ४९ दिवसांचे आंदोलन मागे घेतल्यापासून आंदोलकांवरील सर्व एफआयआर तात्काळ मागे घेण्याची, ताब्यात घेतलेल्या विद्यार्थ्यांची सुटका करण्याची आणि स्वयंसेवकांवर होणारी पाळत व छळ थांबवण्याची मागणी केली होती. जी सरकाने मान्य केली होती. मात्र केंद्र सरकारकडून शब्द पाळला जात नसल्याचा आरोप सीजेपीने केला आहे.

'एक्स'वरील एका पोस्टमध्ये, कॉकरोच जनता पार्टीचे प्रवक्ते अभिषेक रांका यांनी आरोप केला की, आंदोलकांवर कोणतीही दंडात्मक ▶▶ पान २ वर

# पोलिसांच्या अतिरेकी कारवाईचे समर्थन करता येत नाही !

## शांततापूर्ण निदर्शने करण्याचा अधिकार कायद्यानेच सुनिश्चित–सर्वोच्च न्यायालय



दिल्ली । वृत्तसंस्था

शांततापूर्ण निदर्शने करण्याचा अधिकार कायद्याने सुनिश्चित केला आहे आणि अशा आंदोलनांदरम्यान पोलिसांकडून होणाऱ्या अतिरेकी कारवाईचे समर्थन केले जाऊ शकत नाही, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी तोंडी नोंदवले. शैलेन्द्र मणी त्रिपाठी विरुद्ध भारत सरकार व इतर खटल्यावरील सुनावणीवेळी न्यायालयाने आपले निरिक्षण नोंदवले.

भारताचे सरन्यायाधीश आणि न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची व न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने असेही नमूद केले की, पोलीस कर्मचाऱ्यांसह प्रत्येक व्यक्तीचा जीव महत्त्वाचा आहे. ▶▶ पान २ वर

# मुंढेंना धक्का: दूध पुरवठादारांच्या परवाने निलंबनाला स्थगिती



छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

काही दूध पुरवठादार आणि विक्रेत्यांचे परवाने निलंबित करण्याच्या अन्न आणि औषध प्रशासनाच्या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयाने अंतरिम स्थगिती दिली आहे. कायद्यानुसार आवश्यक असलेल्या प्रक्रियेचे पालन करण्यात आले नसल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. अशा कठोर कारवाईपूर्वी सुधारणेबाबतची नोटीस देणे आणि सुनावणीची संधी देणे ही कायदेशीर प्रक्रिया आवश्यक होती, असे औरंगाबाद खंडपीठाने नमूद केले.

न्यायमूर्ती एस. जी. चपळगावकर यांच्या एकल खंडपीठाने, संबंधित दूध विक्रेते आणि पुरवठादारांनी ▶▶ पान २ वर

# भारतातील ४५ टक्के मुख्यमंत्र्यांवर गुन्हेगारी खटले!

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**भारतासारख्या देशात अजूनही मोठ्या संख्येने जनता दारिद्र्यरेषेखाली जगत आहे. मात्र, देशात असे अनेक नेते आहेत ज्यांच्याकडे पैशाची कमतरता नाही. अलीकडेच, देशातील राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये सत्तेवर असलेल्या मुख्यमंत्र्यांचा एक नवीन अहवाल प्रसिद्ध झाला आहे. त्यातून धक्कादायक माहिती उघड झाली आहे. भारतातील जवळपास ४५ टक्के मुख्यमंत्र्यांवर गुन्हेगारी खटले त्यातील चार अब्जाधीश आहेत. ही माहिती एडीआर अहवालातून उघड झाली आहे.**




गेल्या निवडणुकीदरम्यान दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रांमधून ३१ मुख्यमंत्र्यांविषयी काही महत्त्वाची माहिती उघड झाली आहे. या ३१ मुख्यमंत्र्यांपैकी चार जणांकडे १०० कोटींहून अधिक रुपयांची मालमत्ता आहे. असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स आणि नॅशनल इलेक्शन वॉच यांनी प्रसिद्ध केलेला नवा अहवाल देशातील सर्वोच्च राजकारण्यांच्या आर्थिक परिस्थितीचे चित्र सादर करतो. हा अहवाल मागील निवडणुकीदरम्यान सर्व ३१ विद्यमान मुख्यमंत्र्यांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रांच्या आधारे तयार करण्यात आला आहे. एडीआरच्या अहवालानुसार, ३१ पैकी १४ मुख्यमंत्र्यांनी (४५%) त्यांच्यावर दाखल असलेले फौजदारी खटले जाहीर केले आहेत. सर्वात धक्कादायक गोष्ट म्हणजे या १४ मुख्यमंत्र्यांपैकी ११ जणांवर अत्यंत गंभीर गुन्हेगारी आरोप आहेत. या गंभीर प्रकरणांमध्ये हत्येचा प्रयत्न(भारतीय दंड संहितेचे कलम ३०७), लाचखोरी आणि गुन्हेगारी धमकी यांसारख्या गंभीर आरोपांचा समावेश आहे. वृत्तानुसार, दोन मुख्यमंत्र्यांवर हत्येच्या प्रयत्नासारखे गंभीर आरोप आहेत. या ३१ मुख्यमंत्र्यांपैकी चार जणांची, म्हणजेच १३ टक्क्यांची संपत्ती १०० कोटी रुपयांपेक्षा ▶▶ पान २ वर

### सामान्यांपेक्षा पुढाऱ्यांची संपत्ती अधिक

*भारतीय राजकारण्यांची संपत्ती सामान्य नागरिकांपेक्षा कित्येक पटींनी जास्त असल्याचे मानले जाते. ताज्या अहवालातून हे नेते श्रीमंत असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. सर्व ३१ मुख्यमंत्र्यांची एकूण घोषित संपत्ती ३,६६० कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. देशातील एका मुख्यमंत्र्यांची सरासरी संपत्ती ११८.०७ कोटी रुपये आहे.*

# परीक्षा दुरुस्ती विधेयक सादर

## विरोधकांचा गदारोळ कामकाज तहकूब

दिल्ली । वृत्तसंस्था

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या आठवड्यातील कामकाजाला सोमवारी (दि. २७ जुलै) सुरुवात झाली. पण विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान पोलिसांनी केलेल्या कारवाईचा मुद्दा उपस्थित करत लोकसभेत विरोधकांनी गदारोळ केला. यामुळे लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सभागृहाचे कामकाज आधी १२ पर्यंत आणि त्यानंतर दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब केले. तसेच राज्यसभेतही पेपरफुटी प्रकरणी विरोधकांच्या गोंधळामुळे कामकाज २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले होते.

लोकसभेचे कामकाज दुपारी १२ वाजता पुन्हा सुरु झाल्यानंतरही विरोधकांचा गदारोळ कायम राहिला. केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी परीक्षा दुरुस्ती विधेयक, २०२६ मांडले. पण काही मिनिटांतच सभागृहातील विरोधकांच्या गदारोळामुळे ▶▶ पान २ वर

## अग्रलेख

# प्रधान गेले; प्रश्न अजूनही उभेच!

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याने देशाच्या शिक्षण व्यवस्थेतील गंभीर प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आले आहेत. हा केवळ एका मंत्र्याचा राजीनामा नसून, विद्यार्थ्यांच्या रोषाने आणि लोकशाहीतील जनदबावाने घडवून आणलेली महत्त्वाची घटना आहे. वर्षानुवर्षे मेहनत घेणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्या परीक्षा व्यवस्थेतील त्रुटींविरोधात उभ्या राहिलेल्या आवाजाने अखेर सरकारला जबाबदारी स्वीकारण्यास भाग पाडले.

मंत्री बदलला म्हणजे व्यवस्था बदलते, असे नाही. पेपरफुटी, निकालातील विसंगती, परीक्षा प्रक्रियेतील गैरव्यवहार आणि राष्ट्रीय चाचणी संस्थेवरील प्रश्न केवळ एका व्यक्तीच्या राजीनाम्याने संपणार नाहीत. विद्यार्थ्यांसाठी परीक्षा ही केवळ सरकारी प्रक्रिया नसते; ती त्यांच्या मेहनतीचा, पालकांच्या त्यागाचा आणि भविष्यातील आयुष्याचा निर्णायक टप्पा असतो. त्यामुळे या व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. सरकारने आता केवळ राजीनाम्यावर समाधान मानू नये. शिक्षण मंत्रालयातील जबाबदार अधिकारी, परीक्षा प्रक्रियेत गैरव्यवहार करणारे घटक, पेपरफुटीचे रॅकेट चालविणारे आणि पैशांच्या बदल्यात यशाची हमी देणाऱ्या बोगस क्लासेस व अकॅडमी चालकांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. दोषींना शिक्षा झाली, तरच भविष्यात अशा प्रकारांना आळा बसू शकतो. आजचा विद्यार्थी पूर्वीपेक्षा अधिक जागरूक आहे. डिजिटल माध्यमे आणि माहितीच्या सहज उपलब्धतेमुळे तो सरकारी दाव्यांची पडताळणी करू शकतो. त्यामुळे ''सरकार म्हणते तेच सत्य'' हा काळ आता मागे पडला आहे. विद्यार्थ्यांना आश्वासने नव्हे, तर उत्तरदायित्व हवे आहे. जबाबदारी निश्चित झालेली दिसली पाहिजे आणि व्यवस्था सुधारत असल्याचा विश्वास निर्माण झाला पाहिजे. नव्या शिक्षणमंत्र्यांसमोर सर्वांत मोठे आव्हान मंत्रालय चालविण्याचे नसून, विद्यार्थ्यांचा हरवलेला विश्वास परत मिळविण्याचे आहे. त्यासाठी राष्ट्रीय परीक्षा व्यवस्थेचे स्वतंत्र व पारदर्शक ऑडिट होणे आवश्यक आहे. प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून ते निकाल जाहीर होईपर्यंत प्रत्येक टप्प्यावर सुरक्षा, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व सुनिश्चित केले पाहिजे. तक्रार निवारण यंत्रणाही सक्षम व विश्वासार्ह असली पाहिजे. लोकशाहीत सरकारला प्रश्न विचारणे हा गुन्हा नसून नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे. प्रत्येक वेळी आंदोलनानंतरच सरकारला जाग येणार असेल, तर प्रशासनाच्या संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह उभे राहते. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याचा राजकीय अर्थ वेगवेगळा लावला जाईल; मात्र या घटनेचा खरा संदेश असा आहे की, जनतेचा आणि विशेषतः विद्यार्थ्यांचा विश्वास हा कोणत्याही सत्तेपेक्षा मोठा असतो. आता सरकारने राजीनाम्याच्या राजकारणातून बाहेर पडून सुधारणांच्या राजकारणाकडे वळण्याची गरज आहे. कारण पुढची परीक्षा एखाद्या मंत्र्याची नाही, तर संपूर्ण परीक्षा व्यवस्थेची आहे. त्या परीक्षेचे परीक्षक यावेळी देशातील विद्यार्थी आहेत. प्रधान गेले, पण प्रश्न अजूनही शिल्लक आहेत. आता सरकारने खुर्चीचा नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या भविष्याचा हिशेब द्यायलाच हवा.

## 'महाकाल ग्रुप'च्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त फराळाचे वाटप



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील बसस्टँड च्या मागे, सिमेंट रोडवर 'महाकाल ग्रुप, बीड' च्या वतीने प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी शनिवार दि. २५ रोजी आषाढी एकादशीनिमित्त वारकरी, भाविकांसाठी फराळाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास ज्येष्ठ नेते तथा प्राध्यापक जगदीश काळे, भरत झांबरे, दराडे बापू , श्रीधरबप्पा घुगे, नितीन सपकाळ, गणेश तळेकर, संभाजी मुंडे, अशोक गायकवाड, हर्षल कांग गावडे, सूर्यकिरण घुगे, आदी महाकाल ग्रुपच्या मित्र मंडळाच्या वतीने या भव्य दिव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी पांडुरंग परमात्मा विठ्ठलाची पूजा करून फराळ वाटपाच्या कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला.

## घुले खून प्रकरणात तक्रार मागे घेण्यासाठी जीवे मारण्याची धमकी

**केज । प्रतिनिधी**

**तालुक्यातील टाकळी येथील एका युवकाच्या निर्घृण खुनातील दाखल तक्रार मागे घेण्यासाठी मयताच्या भावाला मध्यरात्री धमकावल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी पोलीस ठाण्यात अर्ज देण्यात आला असून, आरोपींनी सौरभ सोनवणे याचे नाव तक्रारीतून मागे न घेतल्यास जीवे मारण्याची धमकी दिली आहे.**

रमेश नवनाथ धुले (रा. टाकळी, ता. केज, जि. बीड) यांनी दिलेल्या अर्जानुसार, त्यांचा भाऊ विलास नवनाथ धुले याचा दि. २० जून २०२६ रोजी निर्घृण खून करण्यात आला होता. या खुनाच्या संदर्भात पोलिसांनी तक्रार दाखल करून घेतली आहे. दरम्यान, हीच तक्रार मागे घेण्यासाठी काही जणांनी मध्यरात्री २ ते ३ च्या सुमारास रमेश धुले यांच्या घराचा दरवाजा वाजवून दहशत निर्माण केली. तक्रारीतून सौरभ सोनवणे यांचे नाव मागे घ्यावे, अन्यथा जिथे दिसशील तिथे संपवून टाकू, अशी धमकी देऊन ते पसार झाले. घराचा दरवाजा उघडून बाहेर पाहिले असता, अंदाजे २५ ते ३० वयोगटातील दोन अज्ञात व्यक्ती पळून जात असल्याचे फिर्यादीच्या निदर्शनास आले. या प्रकरणी जीवितास धोका निर्माण झाल्यामुळे रमेश धुले यांनी मा.पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे केज यांच्याकडे अर्ज सादर केला असून, या प्रकारची गंभीर दखल घेऊन लवकरात लवकर योग्य ती कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी विनंती केली आहे.

## माजलगाव बस स्थानकात महिलाच्या गळ्यातील दागिने चोरणारे दोन आरोपी जेरबंद

**माजलगाव । प्रतिनिधी**

**नवीन बस स्थानकात प्रवाशाची गर्दीचा फायदा घेऊन महिलेच्या गळ्यातील सोन्याची पोत लांबवणाऱ्या दोन अज्ञातांना माजलगाव शहर पोलिसांनी शिताफीने अटक केली आहे. त्यांच्याकडून चोरीस गेलेला ऐवज हस्तगत करण्यात आला असून, या कारवाईमुळे शहर व परिसरात खळबळ उडाली आहे.**



पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी सखुबाई मुरलीधर गायकवाड (वय ७० वर्षे, रा. वाघोरा, ता. माजलगाव) या दिनांक १५ जुलै २०२६ रोजी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास माजलगाव नवीन बस स्थानकावरून बसमध्ये चढत असताना दोन अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील सोन्याची पोत लांबवली. या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तांत्रिक विश्लेषणाद्वारे आरोपी निष्पन्न गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी घटनास्थळावरील व परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषणाचा आधार घेत कसून तपास केला. सारीका गोरक्ष शिंदे (वय ३६ वर्षे, व्यवसाय: मजुरी, रा. शंकरनगर, पाथर्डी, जि. अहमदनगर) वैजीनाथ नामदेव गुंजाळ (वय ५५ वर्षे, व्यवसाय: मजुरी, रा. गांधीनगर, बीड, ता. जि. बीड) पोलीस पथकाने २७ जुलै २०२६ रोजी दोन्ही आरोपींना अटक केली. अटकेदरम्यान त्यांच्याकडून गुन्ह्यात चोरीस गेलेली ७ ग्रॅम वजनाची सोन्याची पोत (ज्यामध्ये १०० मनी व दोन डोरले आहेत) असा एकूण ३४,७९० रुपये किमतीचा मुद्देमाल यशस्वीरित्या हस्तगत करण्यात आला आहे. सदर यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक आनंत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे, सहायक पोलीस निरीक्षक कल्याण नेहरकर, शिवाजी पवार, पोलीस हवालदार किशोर जाधव, गोविंद पाखरे आणि पोलीस कॉन्स्टेबल महेश चव्हाण यांच्या पथकाने पार पाडली.

## पोलीस पाटील व कोतवालांना जिल्हाधिकारी यांच्या हस्ते आपदा मित्र किट व प्रमाणपत्रांचे वितरण

**जालना । प्रतिनिधी**

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना यांच्या वतीने रायगड येथे आयोजित १२ दिवसांचे निवासी 'आपदा मित्र' प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करून आलेल्या ६८ पोलीस पाटील व कोतवालांना आज जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आशिमा मित्तल यांच्या हस्ते आपदा मित्र किट तसेच प्रशिक्षण पूर्ण केल्याबद्दल प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.**



यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करताना सांगितले की, गावपातळीवर सक्षम व प्रशिक्षित स्वयंसेवकांची फळी निर्माण करून आपत्ती व्यवस्थापन अधिक परिणामकारक करण्यासाठी जिल्हा प्रशासन सातत्याने प्रयत्नशील आहे. आपत्तीच्या प्रसंगी गावपातळीवर सर्वप्रथम मदतीसाठी धावून जाणारे पोलीस पाटील व कोतवाल हे प्रशासनाचे महत्त्वाचे दुवे असून, रायगड येथे प्राप्त केलेले आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण, शोध व बचाव कार्य, प्रथमोपचार, पूर, वीज पडणे, अग्नी दुर्घटना, सर्पदंश तसेच आपत्कालीन परिस्थितीतील समन्वयाचे कौशल्य प्रत्यक्ष कार्यात वापरून गावातील नागरिकांचे जीवित व वित्तहानी कमी करण्यासाठी त्यांनी सक्रिय भूमिका बजावावी, असे आवाहन त्यांनी केले. रायगड येथे आयोजित निवासी प्रशिक्षणामध्ये प्रशिक्षणार्थींना तज्ज्ञ प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आपत्तीपूर्व तयारी, आपत्तीच्या काळातील तात्काळ प्रतिसाद, शोध व बचाव कार्य, प्रथमोपचार, दोरीच्या साहाय्याने बचाव तंत्र, जलबचाव, अग्निसुरक्षा, समुदाय आधारित आपत्ती व्यवस्थापन तसेच विविध आपत्तीजन्य परिस्थितींचा प्रत्यक्ष सराव देण्यात आला. प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या ६८ पोलीस पाटील व कोतवालांना गावपातळीवर प्रभावी आपत्कालीन प्रतिसाद देण्यासाठी आवश्यक साहित्य असलेले आपदा मित्र किट तसेच प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र जिल्हाधिकारी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. यावेळी जालना शहर महानगरपालिकेच्या महापौर वंदनाताई मगरे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी दीपक काजळकर, सतीश उढाण, ज्ञानेश्वर राऊत, छत्रसिंग कायते, राहुल बिजुले तसेच प्रशिक्षण पूर्ण केलेले पोलीस पाटील व कोतवाल उपस्थित होते.

## अंबड पोलिसांची मोठी कामगिरी; ८ मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस, एक नॅनो कार व मोटार सायकलचे सुटे पार्ट्स जप्त

**अंबड । प्रतिनिधी**

**गेल्या काही दिवसांपासून अंबड शहरात मोटारसायकल चोरीच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली होती. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर अंबड पोलीस स्टेशनने मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यांचा समांतर तपास सुरू करून वाहनचोरांच्या टोळीचा पर्दाफाश करण्यात उल्लेखनीय यश मिळविले आहे.**




अंबड पोलीस स्टेशनच्या पथकाने ०८ मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणत ९ मोटारसायकली, एक नॅनो कार तसेच मोठ्या प्रमाणात वाहनांचे सुटे पार्ट्स जप्त केले आहेत. तपासादरम्यान उघडकीस आलेल्या माहितीनुसार, आरोपी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने मोटारसायकल चोरी करत होते. टोळीतील एक सदस्य सार्वजनिक ठिकाणी उभ्या असलेल्या मोटारसायकलवर लक्ष ठेवत असे. वाहनमालक वाहन पार्क करून दूर गेल्यानंतर इतर साथीदार क्षणात मोटारसायकल चोरी करून घेऊन जात असत. चोरी केलेल्या मोटारसायकली निर्जन ठिकाणी नेऊन त्यांची तोडफोड करण्यात येत असे. त्यानंतर इंजिन, मॅग व्हील, पेट्रोल टैंक तसेच इतर सुटे भाग वेगळे करून गरजू व्यक्तींना विक्री करण्यात येत होती.पोलिसांना गुप्त माहिती मिळाली की, अंबड येथील इरफान शेख अलताफ शेख, रा. मदीना चौक, अंबड ता. अंबड जि. जालना याच्याकडे विविध मोटारसायकलीचे इंजिन, मॅग व्हील, व इतर सुटे पार्ट्स विक्रीसाठी उपलब्ध आहेत. त्यानुसार पोलिसांनी त्यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता, लखन दिलीप खुळे रा. छ. संभाजीनगर ह. मु. चांगले नगर अंबड ता. अंबड व सुशिल उर्फ मायकल अंकुश खुळे रा. चांगले नगर अंबड ता. अंबड जि.जालना यांनी चोरीच्या मोटारसायकली त्याच्याकडे आणून दिल्याची तसेच त्या आपल्या अन्य दोन साथीदार नामे समीर सलीम सैय्यद, व अज्जू सलीम सैय्यद दोन्ही रा. अंबड ता. अंबड जि. जालना यांच्यासह तोडून त्यांचे स्पेअर पार्ट्स विक्री केल्याची कबुली दिली. त्यांच्याकडे आणखी मोटारसायकली असल्याची माहितीही त्याने पोलिसांना दिली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तात्काळ लखन खुळे, सुशिल उर्फ मायकल खुळे व इतर साथीदाराना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनीही मोटारसायकल चोरी करून त्यांचे सुटे भाग विक्री केल्याची कबुली दिली. या कारवाईत एकुण ५,१५,०००/- रुपयांचा मुद्देमाल व ०५ आरोपी ताब्यात घेण्यात आले असून मोटारसायकल चोरीचे एकूण ०८ गुन्हे उघडकीस आणण्यात अंबड पोलिसांना यश आले आहे. तसेच नमुद आरोपीकडुन आजुन गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. सदरची कामगीरी पोलीस अधीक्षक श्री तेघबीर सिंग संधु , मा. अपर पोलीस अधीक्षक श्री विक्रम साळी . मा. उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सिध्देश्वर धुमाळ , यांचे मार्गदर्शनाखाली अंबड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री संतोष घोडके यांच्यासह गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोउपनि भगवान नरोडे व अंमलदार यांनी केली आहे.

## पान १ वरून...

### शेतकरीहिताच्या योजनांत

विविध योजनांच्या प्रगतीचाही सविस्तर आढावा घेण्यात आला. फळबाग विकास, भाजीपाला, मसाला पिके, फुलशेती तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराद्वारे उत्पादनवाढीसाठी सुरू असलेल्या कामांना अधिक गती देण्याच्या सूचना देण्यात आल्या. याशिवाय डिजिटल शेती, कृषी विस्तार सेवा, राष्ट्रीय फलोत्पादन अभियान, दर्जेदार बियाणे उत्पादन व वितरण, गळीत धान्य विकास आणि कृषी वनीकरण या महत्त्वाच्या घटकांतील निधी खर्चाला वेग देण्याचे आवाहनही केंद्रीय मंत्र्यांनी केले. शेतकऱ्यांपर्यंत योजनांचा लाभ अधिक प्रभावीपणे पोहोचावा आणि कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढावा, यासाठी केंद्र आणि राज्यांनी समन्वयाने काम कण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. बैठकीत प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या अंमलबजावणीचाही आढावा घेण्यात आला. नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीपासून शेतकऱ्यांना वेळेत आर्थिक संरक्षण मिळावे, यासाठी विमा दाव्यांच्या जलद निकाली काढण्यावर आणि योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात आला.ङ्मया बैठकीत महाराष्ट्राने कृषी योजनांच्या अंमलबजावणीत दाखविलेली कार्यक्षमता, निधीचा वेळेत वापर आणि शेतकरी हिताच्या उपक्रमांमुळे राज्याची कामगिरी देशात आदर्श ठरत असल्याचे मत केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी व्यक्त केले.

--------------

### धर्मेंद्र प्रधानांची विकेट, राज्यांतील

मागणी आहे. पेपर फुटीमुळे ३.५ लाख तरुणांचं भवितव्य अडचणीत आल्याचा दावा वायएसआर काँग्रेसचे नेते आणि माजी शिक्षण मंत्री आदिमुलापु सुरेश यांनी केला आहे.तेलंगणात भाजपनं थेट मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांच्यावर आरोप केले आहेत. रेड्डी यांच्याकडे शिक्षण मंत्रिपद आहे. राज्य सरकार विद्यार्थ्यांना ट्युशन फीज री-एंबर्समेंट योजनेच्या अंतर्गत अडकलेले १२ हजार कोटी रुपये देऊ शकत नसल्यास मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी शिक्षण मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी तेलंगणा भाजपचे प्रदेशाध्यक्ष एन. रामचंदर राव यांनी केली आहे.

-------------

### नीट खटल्याला 'फास्ट ट्रॅक'

त्यांच्यावर आरोप आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २३ जुलै रोजी घोषणा केली की, पेपरफुटीशी संबंधित प्रकरणांवर जलदगतीने निर्णय घेण्यासाठी एक जलदगती न्यायालय स्थापन केले जाईल. त्यांनी सांगितले की, तरुणांचे हित हे सरकारचे सर्वोच्च प्राधान्य आहे. नीट पेपरफुटीच्या निषेधार्थ कॉकरोच जनता पक्षाने जंतर मंतरवर ३६ दिवस आंदोलन केले. २० जुलै रोजी, संसदेकडे मोर्चा काढत असताना विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज करण्यात आला. प्रकरण चिघळले. आता विरोधी पक्षांनीही या संपूर्ण मुद्द्यावरून सरकारवर टीका करण्यास सुरुवात केली आहे.

-----------

### केंद्र सरकारने शब्द

कारवाई केली जाणार नाही, या आपल्या आश्वासनाचे सरकारने उल्लंघन केले आहे. अभिषेक रांका आपल्या पोस्टमध्ये पुढे म्हणाले की, आंदोलकांवर कोणतीही पोलीस कारवाई न करण्यासंदर्भातील कराराचा संपूर्ण भंग होत असल्याचे आम्ही पाहत आहोत. बिहार आणि बंगालमध्ये शेकडो विद्यार्थ्यांना अटक करण्यात आली आहे, आणि दिल्ली व इतर राज्यांमध्ये शेकडो विद्यार्थ्यांवर पाळत ठेवून त्यांचा छळ केला जात आहे. आंदोलकांना रसद पुरवणाऱ्या स्वयंसेवकांना दिल्लीत ताब्यात घेतल्याचे अनेक वृत्त समोर येत आहे,'' असेही त्यांनी म्हटले आहे. कॉकरोच जनता पार्टीने मागणी केली आहे की, आंदोलकांविरुद्ध दाखल केलेले सर्व एफआयआर तात्काळ मागे घ्यावेत आणि दिल्ली पोलीस, केंद्रीय तपास यंत्रणा किंवा भाजपशासित किंवा भाजप-मित्र राज्यांमधील पोलीस दलांनी कोणतेही नवीन गुन्हे दाखल करू नयेत. असे न झाल्यास, आम्हाला पुन्हा आंदोलनावर बसावे लागेल, असा इशाराही यावेळी केंद्राला दिला. या संघटनेने केंद्रासोबत ठरलेल्या कालमर्यादेसह, कायदेशीर खटल्यांसंदर्भातील कराराची लेखी प्रत बुधवारपर्यंत देण्याची मागणीही केली. कॉकरोच जनता पार्टी या विद्यार्थी संघटनेने म्हटले होते की, या करारामध्ये केंद्र सरकार आणि एनडीए-शासित राज्यांनी आंदोलक आणि आयोजकांविरुद्ध दाखल केलेल्या सर्व एफआयआर मागे घेणे, आंदोलनात सहभागी असलेल्या कोणावरही भविष्यात कोणतीही कारवाई केली जाणार नाही याची हमी, नीट पेपरफुटीशी संबंधित आत्महत्याग्रस्तांच्या कुटुंबीयांना ''शक्य तितकी जास्तीत जास्त भरपाई'' आणि सरकारने आपल्या पाच-कलमी परीक्षा सुधारणा सनदेवर विचार करण्याचे वचन देणे, यांचा समावेश होता.

**'पुन्हा एकदा रस्त्यावर उतरू'**

बिहार आणि बंगालमध्ये शेकडो विद्यार्थ्यांना अटक झाली आहे. दिल्ली आणि इतर राज्यांमध्ये शेकडो जणांवर पाळत ठेवली जात आहे. आंदोलकांवरील सर्व एफआयआर त्वरित मागे घेतले जावेत, विद्यार्थ्यांना मुक्त केले जावे. आंदोलक विद्यार्थ्यांवर दाखल झालेले गुन्हे त्वरित मागे न घेतल्यास आणि स्थानबद्ध केलेल्यांना मोकळे न केल्यास पुन्हा एकदा रस्त्यावर उतरू, असा इशारा कॉकरोच जनता पार्टीने दिला आहे. २२ जुलै आणि २५ जुलै रोजी झालेल्या निदर्शनांनंतर बिहारमध्ये आंदोलकांवर पोलीस कारवाई सुरूच आहे. आंदोलकांच्या वकिलांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यभरातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये अजूनही सुमारे २०० जण पोलीस कोठडीत आहेत. दरम्यान, साक्षी या संकेतस्थळाची (वेबसाईट) घोषणा यावेळी करण्यात आली आहे.

------------

### माजलगावच्या भाजप पदाधिकाऱ्यांन

वगळण्यात आल्याची चर्चा आता माजलगावच्या राजकीय वर्तुळात रंगली आहे. माजलगाव तालुक्यातील भाजप नेत्यांना किंवा कार्यकर्त्यांना नेमकी मुख्यमंत्र्यांची ॲलर्जी का आहे, असा सवाल यातून उपस्थित होत आहे. तसेच, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा स्थानिक नेत्यांना विसर पडला की त्यांना मुख्यमंत्र्यांची आवश्यकता राहिली नाही, असाही प्रश्न या निमित्ताने उपस्थित केला जात आहे. पंकजाताईंच्या वाढदिवसाच्या निमित्ताने समोर आलेला हा बॅनर पॅटर्न आता राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत असून, यावर पक्षांतर्गत किंवा राजकीय पातळीवर काय पडसाद उमटतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

--------------

### मुंढेंना धक्का: दूध पुरवठादारांच्या

दाखल केलेल्या स्वतंत्र याचिकांवर सुनावणी करताना हे आदेश दिले. अन्न सुरक्षा मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन केल्याच्या आरोपावरून एफडीएने याचिकाकर्त्यांचे परवाने निलंबित केले होते. केवळ किरकोळ त्रुटी होत्या, असा दावा याचिकाकर्त्यांनी केला. कायद्याच्या तरतुदींनुसार, परवाना निलंबित करण्यासारखा कठोर निर्णय घेण्यापूर्वी सुधारणेबाबतची नोटीस बजावणे आवश्यक होते. तपासणीदरम्यान एफडीएला आढळलेल्या बहुतांश त्रुटी या गंभीर स्वरूपाच्या नव्हत्या, ज्यासाठी दूध प्रक्रिया प्रकल्प बंद करणे किंवा परवाने अचानक निलंबित करणे गरजेचे ठरावे, असे खंडपीठाने म्हटले. खंडपीठाने एफडीएला नोटीस बजावली आणि याचिकाकर्त्यांचे परवाने निलंबित करण्याच्या निर्णयाला अंतरिम स्थगिती दिली. कोणतीही नोटीस न देता परवाना निलंबित करण्याचा अधिकार एफडीए अधिकाऱ्याला आहे, असा दावा सरकारने केला. मात्र, सुधारणेबाबतची नोटीस न देता किंवा याचिकाकर्त्यांना सुनावणीची संधी न देता अशी कठोर कारवाई करण्यास भाग पाडणारी कोणतीही तातडीची परिस्थिती अस्तित्वात असल्याचे आढळले नाही, असे निरीक्षण खंडपीठाने नोंदवले.

-----------

### पोलिसांच्या अतिरेकी कारवाईचे

सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमुर्ती सुर्यकांत पुढे म्हणाले की, शांततापूर्ण निदर्शने करण्याचा अधिकार पूर्णपणे सुनिश्चित आहे. तो नाकारला जाऊ शकत नाही. केवळ आंदोलन सुरू आहे म्हणून पोलिसांच्या अतिरेकी कारवाईचे समर्थन करता येणार नाही, असे नमूद केले. त्यांनी अशा निदर्शनांदरम्यान स्वयं-शिस्त पाळण्याचे आवाहन केले. न्यायमुर्ती सुर्यकांत म्हणाले की, केवळ आंदोलन सुरू आहे याचा अर्थ लाठीचा३३र्ज केलाच पाहिजे असा होत नाही. लोकशाही प्रक्रियेसाठी आवश्यक असलेली स्वयं-शिस्त पाळणे गरजेचे आहे, असल्याचेही यावेळी सांगितले. शांततापूर्ण निदर्शनांना परवानगी मिळावी यासाठी देशभर लागू होणाऱ्या मार्गदर्शक तत्त्वांची मागणी करणाऱ्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयाकडून सुनावणी घेण्यात येत होती. दिल्लीतील जंतर-मंतर आणि बिहारमध्ये निदर्शकांवर पोलिसांनी अलीकडेच केलेल्या बळाच्या वापराच्या पार्श्वभूमीवर या याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. एका याचिकाकर्त्याच्या वतीने बाजू मांडताना वकील फौजिया शकील यांनी सांगितले की, बिहार बंद दरम्यान सिवान येथे सुरक्षा दलांनी एके-४७ या स्वयंचलित बंदुकीचा वापर केला होता. काल एके-४७ चा वापर करण्यात आला, असे वकील फौजिया शकील यांनी याचिकाकर्त्यांच्या वतीने सांगितले. दुसऱ्या एका याचिकाकर्त्याच्या वतीने ज्येष्ठ वकील विकास सिंग म्हणाले की, बिहारमध्ये विद्यार्थ्यांवरही अनेक हल्ले झाले. यासाठी संपूर्ण देशासाठी लागू होणारा आदेश आवश्यक आहे, असे म्हणाले. आणखी एका वकिलाने अशा निदर्शनांदरम्यान जखमी झालेल्या सुरक्षा आणि पोलीस कर्मचाऱ्यांच्या दुर्दशेकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. यावर सरन्यायाधीश सुर्यकांत म्हणाले की, यासाठी एक कार्यपद्धती (प्रोटोकॉल) असायला हवी. निदर्शनांसाठी योग्य जागा असावी आणि त्यावर कोणतेही निर्बंध नसावेत. मात्र, जर काही समाजकंटक इत्यादींचा सहभाग असेल, तर त्याबाबत योग्य ती कारवाई केली जाऊ शकते. हा केवळ दिल्ली पुरता प्रश्न नाही. कार्यपद्धतीत एकसमानता असणे गरजेचे आहे, असेही नमूद केले.

------------

### परीक्षा दुरुस्ती विधेयक सादर

लोकसभेचे कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले. लोकसभेत प्रश्नोत्तराचा तास सुरू होताच विरोधी पक्षाच्या खासदारांनी सभागृहाच्या वेलमध्ये उतरून जोरदार घोषणाबाजी केली. अध्यक्ष ओम बिर्ला यांनी त्यांना आपापल्या जागेवर परत जाऊन बसावे आणि प्रश्नोत्तराचा तास सुरु ठेवण्याचे आवाहन केले. सदस्यांचे असे वर्तन लोकशाही मुल्यांशी अनुरूप नसल्याचे सांगत त्यांनी विरोधी पक्षांतील खासदारांना कारवाईचा इशारा दिला. तरीही विरोधी पक्षाच्या खासदारांचा गोंधळ सुरुच राहिला. यामुळे लोकसभा अध्यक्षांनी दुपारी १२ वाजेपर्यंत सभागृहाचे कामकाज तहकूब केले. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत महिलांच्या ४८ किलो वजनी गटात वेटलिफ्टिंगमध्ये भारताला पहिले सुवर्णपदक जिंकून दिल्याबद्दल मीराबाई चानू यांचे अभिनंदन केले. राज्यसभेत विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी नीट पेपरफुटी आणि विद्यार्थ्यांवर केलेल्या लाठीचार्जचा मुद्दा उपस्थित केला. यावर नियम २६७ नुसार चर्चा झाली पाहिजे. खर्गे बोलत असतानाच राज्यसभेचे सभापती सी. पी. राधाकृष्णन यांनी सभागृहाचे कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब केले. दरम्यान, दिल्लीतील जंतर-मंतरवर विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान २० जुलै रोजी पोलिसांनी केलेल्या लाठीचार्जच्या घटनेची केंद्रीय गृहमंत्र्यांनी जबाबदारी स्वीकारावी, या मागणीसाठी प्रियांका गांधी वधेरा यांच्यासह विरोधी पक्षांच्या खासदारांनी संसदेच्या मकर द्वार येथे निदर्शने केली.

----------

### भारतातील ४५ टक्के मुख्यमंत्र्यांवर

जास्त आहे, म्हणजेच त्यांचा अब्जाधीशांच्या यादीत समावेश आहे. शिवाय, अहवालात मुख्यमंत्र्यांचे स्वत:चे सरासरी उत्पन्न ६.५४ कोटी असल्याचे नमूद केले आहे, तर सर्व ३१ मुख्यमंत्र्यांचे एकूण वार्षिक उत्पन्न २०३ कोटी आहे.माहिती देणारी एडीआर म्हणजेच असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स, ही निवडणूक सुधारणांसाठी काम करणारी प्रमुख संघटना आहे. निवडणूक लढवणा-या उमेदवारांविषयी, त्यांच्या गुन्हेगारी पार्श्वभूमी, मालमत्ता आणि शिक्षणासह अचूक माहिती जनतेला देणे हे तिचे मुख्य कार्य आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार, दि. २८ जुलै २०२६



## थोडक्यात



### आदर्श गुरुकुलचा दिंडी सोहळा उत्साहात गुरुकुल मध्ये अवतरली पंढरी

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय जन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित आदर्श गुरुकुलची आषाढी एकादशी निमित्त दि.२५ शनिवार रोजी बालदिंडी उत्साहात भक्तिमय आणि शिस्तबद्ध वातावरणात साजरी करण्यात आली.आदर्श गुरुकुलचे मार्गदर्शक श्री. केशव बादाडे, अध्यक्षा सावित्री बादाडे,संचालक ओंकार बादाडे, अंजली घाडगे मॅडम, तुकाराम शिंदे सर यांच्या हस्ते श्री. विठ्ठल - रखुमाईच्या प्रतिमेचे पूजन करून दिंडीची सुरुवात करण्यात आली.

विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणी, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत मुक्ताई आदींच्या वेशभूषाने तसेच डोक्यावर ग्रंथ, तुळशीवृंदावन, कलश, झेंडा पताका त्याचबरोबर सर्व विद्यार्थी मुलींनी काष्टा साडी परिधान करून व मुले पांढरा गुरु शर्ट टोपी रुमाल घेऊन, कपाळी गोपीचंदन टिळा लाऊन उपस्थितांचे मने जिंकली. टाळ मृदंग वाजत गाजत, पावल्या आणि फुगड्या खेळत, ज्ञानोबा माऊली तुकाराम! विठोबा रखुमाई! जयघोष करत भक्तीरसात न्हालेले वातावरणात श्री.केशवराजाच्या चरणी निस्सिम भक्ती अर्पण केली.विद्यार्थ्यांनी शिक्षण, आरोग्य, स्वच्छता,पर्यावरण रक्षण, सामाजिक बांधिलकी, महिला सन्मानाचा सामाजिक संदेश दिला.दिंडीच्या मार्गावर जागोजागी फराळ, फळे, चहा वाटप होता त्याचा आस्वाद घेतला. विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी यांनी श्री. केशवराजाच्या प्राणांगणात फुगडीचा आनंद घेतला नंतर मंदिरात शिस्तीत रांगेत दर्शन घेतले. गुरुकुलामध्ये दिवसभर विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून भक्तिमय वातावरनात पंढरी अवतरली.शेवटी प्रसाद वाटप करून दिंडीची सांगता करण्यात आली. दिंडीचे नियोजन मार्गदर्शक केशव बादाडे, तसेच संचालक ओंकार, तुकाराम शिंदे सर, अधीक्षक स्वरूपा बादाडे, उर्मिला बादाडे, लहू पवार यांच्यासह अनेकांची सहकार्य लाभले.

### विनयभंगाच्या गुन्ह्यात आरोपीस अटकपूर्व जामीन मंजूर

माजलगाव । प्रतिनिधी



येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश-१ यांच्या न्यायालयाने क्रि.बेल अर्ज क्र. २३४/२०२६ मध्ये आरोपी आसाराम चौरे यांचा अटकपूर्व जामीन अर्ज दि.२१ जुलै २०२६ रोजी मंजूर केला. सदर प्रकरणात आरोपीने फिर्यादीची छेडछाड करून तिचा विनयभंग केल्याचा आरोप करून तिला जीवे मारण्याची धमकी दिल्या बाबत ग्रामीण पोलीस स्टेशन माजलगाव येथे गु.र.न. २८८/२०२६ भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ७४ , ३५१(२) अन्वये दिनांक २६/६/२०२६ रोजी गुन्हा नोंद केला होता.

त्यानंतर आरोपीच्या वतीने अटकपूर्वक जामीन मिळावी म्हणून न्यायालयात अर्ज दाखल केला होता आरोपीच्या वतीने प्रभावी युक्तिवाद ॲड.चैतन्य कोरडे यांनी करून आरोपीमार्फत सत्य परिस्थिती न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न करण्यात आला.दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने समोर आलेले प्रकरणातील कागदपत्रे व प्रकरणाची संपूर्ण परिस्थिती विचारात घेऊन आरोपीचा अटकपूर्व जामीन मंजूर केला.सदरील प्रकरणात ॲड.एस.आर. आचार्य यांनी मार्गदर्शन केले.

# वाहतूकीचा नियमभंग करणाऱ्या रिक्षाचालकांना वाहतूक शाखेचा दणका; ३१ रिक्षा जप्त

## जिल्हा न्यायालयात देखील ३५ बेशिस्त वाहनधारकांवर कारवाई



बीड । प्रतिनिधी

शहरातील वाढती वाहतूक कोंडी, बेशिस्त वाहनचालक आणि वाहतूक नियमांचे सर्रास उल्लंघन करणार्या रिक्षाचालकांविरोधात जिल्हा वाहतूक शाखेने धडक कारवाईचा बडगा उगारला आहे. विशेष तपासणी मोहिमेदरम्यान वाहतूक नियमांचे उल्लंघन करणार्या ३१ रिक्षांवर कारवाई करत त्या जप्त करण्यात आल्या. तसेच जिल्हा न्यायालयामध्ये देखील ३५ अस्ताव्यस्त वाहन उभे केलेल्या वाहनधारकांवर कारवाई करुन त्यांच्याकडून ३० हजारांचा दंड वसूल करण्यात आला.या कारवाईमुळे नियमभंग करणार्या वाहनचालकांमध्ये चांगलीच खळबळ उडाली आहे. ही मोहीम पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्या नेतृत्वाखाली तसेच अप्पर पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर आणि पोलीस उपनिरीक्षक विष्णु जायभाये, पोलीस हवालदार मनोज जायभाये, ज्ञानेश्वर जाधव, फुलचंद जाधव, त्रिंबक कुडके, राजाभाऊ तांदळे, पोलीस हवालदार गणेश तळेकर, आदिनाथ मुंडे, सखाराम घोलप, पोलीस अंमलदार संतोष मोरे, राहुल घाडगे, पोलीस चालक संतोष हारके, दत्ता कदम पथकाने शहरातील विविध चौक, मुख्य रस्ते आणि गर्दीच्या ठिकाणी अचानक तपासणी मोहीम राबवून नियमभंग करणाऱ्या रिक्षाचालकांवर कठोर कारवाई केली.

कारवाईदरम्यान वाहनांचे परवाने, नोंदणी कागदपत्रे, विमा, फिटनेस प्रमाणपत्र, प्रदुषण प्रमाणपत्र, ड्रायव्हिंग लायसन्स तसेच वाहतूक नियमांचे पालन यांची सखोल पडताळणी करण्यात आली. आवश्यक कागदपत्रांचा अभाव, नियमांचे उल्लंघन आणि बेशिस्त वाहनचालकांना कोणतीही सवलत न देता संबंधित रिक्षा जप्त करण्यात आल्या. शहरातील वाहतूक शिस्त अबाधित ठेवण्यासाठी अशा प्रकारच्या विशेष मोहिमा यापुढेही सातत्याने आणि अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याचे जिल्हा वाहतूक शाखेने स्पष्ट केले आहे.

> “ बेशिस्त चालकांनी ड्रेसकोड, बॅचबिल्ला, सर्व कागदपत्रे इन्शुरन्स आणि सगळ्याचे महत्वाचे गाडी स्वच्छ ठेवणे आणि माता-भगिनींशी आदराने वागणे तसेच वाहतुकीत बेशिस्तीला कोणताही थारा दिला जाणार नाही. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणार्या प्रत्येक वाहनचालकावर नियमानुसार कठोर दंडात्मक कारवाई केली जाईल. वाहनधारकांनी स्वतःच्या तसेच इतरांच्या सुरक्षिततेसाठी वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करावे.
>
> - वैभव पाटील
>
> पोलीस निरीक्षक, जिल्हा वाहतूक शाखा, बीड

# वारकऱ्यांच्या सेवेमध्ये विठुरायांचे दर्शन घडते - संरपच मयुर आंधळे

## दिंडीतील वारकऱ्यांसाठी पाणी,चहा व फराळीची केली सोय

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील विविध भागातून आषाढी एकादशी निमित्त श्री. क्षेत्र पोखरी या ठिकाणी अनेक दिंड्या जातात. रुई पिंपळा या भागातून दिंडी मार्गस्थ झाली. या दिंड्यांमध्ये सहभागी झालेल्या वारकऱ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून उच्चशिक्षित युवा सरपंच मयुर भैय्या आंधळे यांनी वारकऱ्यांना फराळ, पाण्याची उत्तम सोय करत सेवा केली. वारी, भक्ती आणि वारकऱ्यांची सेवा या माध्यमातूनच विठुरायाचे दर्शन घडते अशी प्रतिक्रिया संरपच मयुर भैय्या आंधळे यांनी दिली.

याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी तालुक्यातील विविध भागातून धाकटी पंढरी समजल्या जाणाऱ्या श्री. क्षेत्र पोखरी या ठिकाणच्या मंदिराला अनेक दिंड्या आषाढी एकादशीनिमित्त भेट देतात. आणि मनोभावे पूजा



करून दर्शन घेतात. आषाढी एकादशीनिमित्त काल रुई (पिंपळा) या भागातून देखील दरवर्षीप्रमाणे यावर्षी वारकऱ्यांची जवळपास ५०० वारकरी लोकांची दिंडी मार्गस्थ झाली. यामध्ये वारकरीसह महिला व तरुण भाविकभक्त मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. या वारकऱ्यांची गैरसोय होऊ नये. या उद्देशाने रुईगावचे आदर्श युवा सरपंच अँड. मयुर भैय्या आंधळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी योग्य ती काळजी घेत दिंडी सोबत कायम पहारा देत उभा राहिले. मंदिरा जवळ दिंडी पोहोचताच वारकऱ्यांना बिसलरी पाण्यासह चहा व फराळाची उत्तम सोय केली. तर या दिंडीतच नाही तर इतर दिंडीतील वारकऱ्यांना देखील सेवा दिली. या सेवेमुळे वारकऱ्यांनी देखील अँड.मयुर भैय्या आंधळे यांना आशीर्वाद दिले. या दिंडीमुळे अखंडित विठुरायाचे दर्शन व सेवा करण्याची संधी मिळते. या भक्तीमुळे व वारकऱ्यांची सेवा घडल्यामुळे प्रत्यक्ष विठुरायांचे मनोभावे दर्शन देखील घडते अशी भावना यावेळी रुई गावचे आदर्श उच्चभूषित, युवा सरपंच मयुरभैय्या आंधळे यांनी व्यक्त केले आहे.

## पान ६ वरुन...

पान ६ वरुन...

### माहिती दडपून भ्रष्टाचार

प्रशासनाकडून दिलेल्या आश्वासनाची पूर्तता न झाल्याने अखेर पुन्हा आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागला असून, सोमवारपासून नगर परिषद कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे. मागितलेली माहिती देण्यास होत असलेली टाळाटाळ थांबवून संबंधित कागदपत्रे व नोंदी तातडीने उपलब्ध करून द्याव्यात, अशी प्रमुख मागणी आंदोलकांनी केली आहे.

**माहिती द्या, अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशारा**

नगर परिषद प्रशासनाने या आंदोलनाची गांभीर्याने दखल

घेऊन मागितलेली माहिती तात्काळ उपलब्ध करून द्यावी. अन्यथा सदर आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा राकेश साळवे यांनी दिला आहे. तसेच नगर परिषद प्रशासनाच्या कारभाराची चौकशी करून मागितलेल्या माहितीबाबत स्पष्टता आणावी अशी मागणीही त्यांनी केली आहे. या आंदोलनासंदर्भातील निवेदनाच्या प्रती उपविभागीय अधिकारी, तहसीलदार तसेच शहर पोलीस निरीक्षक यांच्याकडेही देण्यात आल्या आहेत. त्यामुळे आता संबंधित प्रशासन या प्रकरणाची काय दखल घेते आणि नगर परिषद प्रशासनाकडून आंदोलकांच्या मागण्यांवर कोणती भूमिका घेतली जाते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, नगर परिषद प्रशासनाकडून माहिती देण्यास टाळाटाळ होत असल्याच्या आरोपांबाबत प्रशासनाची अधिकृत भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नाही. त्यामुळे राकेश साळवे यांनी केलेल्या आरोपांवर प्रशासनाकडून काय स्पष्टीकरण दिले जाते, हेही महत्त्वाचे ठरणार आहे.

### छत्रपती संभाजीनगरात राज रायते

दखल घेत यापूर्वीही तेली सेना महाराष्ट्रने त्यांना 'समाजभूषण' पुरस्कार प्रदान करून गौरविले आहे. या मेळाव्यात गुणवंत विद्यार्थ्यांसह समाजातील प्रतिष्ठित नागरिक, पदाधिकारी, समाजबांधव आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमानंतर राज रायते यांना भेटण्यासाठी आणि त्यांच्यासोबत छायाचित्रे काढण्यासाठी चाहत्यांनी मोठी गर्दी केली. त्यांच्या गायनाला आणि झालेल्या सत्काराला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद देत अभिनंदनाचा वर्षाव केला.

### अंबाजोगाईत शेकडो मोकाट

मृत्यूचे कारण लपवू नये म्हणून शासकीय डॉक्टरांकडून पोस्टमार्टम करण्यात यावे दोषी आढळल्यास तात्काळ निलंबनाची कारवाई करावी अशी मागणी लोमटे यांनी केली आहे. कायद्याने नगर परिषदेला फक्त नसबंदी, लसीकरण करण्याचा अधिकार दिला आहे. मारण्याचा अधिकार नाही. तरीही शेकडो जीव एकाच वेळी मेले. हा निव्वळ योगायोग नाही, तर नियोजित कट आहे का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.या घटने संपूर्ण अंबाजोगाई सुन्न झाले आहे. प्राणीप्रेमी आणि नागरिक रस्त्यावर उतरण्याच्या तयारीत आहेत.प्रशासन आता तरी जागे होणार का? की आणखी जीव जाण्याची वाट पाहणार? असा सवाल लोमटे यांनी केला आहे.

### पशुसेवाच्या अनोख्या माध्यमातून

योजना राबवल्या आहेत. त्या योजनांचा लाभ प्रत्येक नागरिकाने घ्यावा. माणसांप्रमाणेच पशुधनाचे आरोग्यही महत्त्वाचे आहे. याच उद्देशाने या पशुधन आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले असून शेतकऱ्यांच्या पाठीशी पंकजाताई कायम खंबीरपणे उभ्या आहेत. असे मत माजी आमदार केशवराव आंधळे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमास माजी आमदार केशवराव आंधळे, भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, माजलगाव मतदारसंघाचे नेते माधव निर्मळ, माजी सभापती दिनकर आंधळे, भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संजय आंधळे, माजी उपनगराध्यक्ष अंकुश वारे, उपनगराध्यक्ष बन्सीधर मुंडे, भाजपा तालुकाध्यक्ष सुखदेव रेडे, महादेव नागरगोजे, विश्वनाथ झाटे, डॉ. रोहिदास खोटे, सरपंच ऋषीकेश खोटे, भगवान कांबळे, नवनाथ तुरे, दिनेश नाईकवाडे, उत्तम नेहरकर, श्रीमंत नेहरकर, अशोक तांदळे, इंदरराव मुंडे, सर्जेराव मिसाळ, महादेव फरांडे, यांका पाटील, अशोक कडेकर बालासाहेब मुंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. पी. बी. कांबळे (पशुचिकित्सक, वडवणी) तसेच पशुसंवर्धन विभागातील तज्ज्ञ पशुवैद्यकीय अधिकारी, डॉक्टरांची टीम, शेतकरी व भाजपा पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हा भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने ईश्वर तांबडे, धनराज मुंडे, रणजित वडने, अभिमान मुंडे, रवी मुंडे, हनुमंत मुंडे, पिंटू पाटील मुंडे, महादेव मुंडे, हनुमंत सांगळे व बळी मुंडे यांनी मोलाचे परिश्रम घेतले.

### मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिराचा

पात्र रुग्णांना विविध उपचार व शस्त्रक्रियांसाठी आवश्यक मार्गदर्शन व मदत मिळणार आहे. रक्त तपासणीसह आवश्यक वैद्यकीय तपासण्यांची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. डोंगरकिन्ही गटातील नागरिकांसाठी ही अत्यंत उपयुक्त आरोग्यसंधी असून, नागरिकांनी वेळ न दवडता या शिबिरात सहभागी व्हावे. आपल्या कुटुंबातील ज्येष्ठ नागरिक, महिला, लहान मुले तसेच आजाराची लक्षणे असलेल्या व्यक्तींनी तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करून घ्यावी, असे आवाहन ड. प्रकाश कवठेकर यांनी केले. मुख्यमंत्री ना. देवेंद्रभाऊ फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या महाआरोग्य शिबिराचा लाभ घेऊन नागरिकांनी आपले आरोग्य जपावे, असेही ड. प्रकाश कवठेकर यांनी नमूद केले.

### माजलगांव तहसील कार्यालयासमोर

हा निर्णय तात्काळ मागे घेऊन अनुसूचित जातींचे विद्यमान आरक्षण अबाधित ठेवावे, अशी मागणी त्यांनी केली. आंदोलनानंतर तहसीलदारांमार्फत शासनाला निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात अनुसूचित जातीच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाचा निर्णय रद्द करून समाजाच्या न्याय्य हक्कांचे संरक्षण करावे, अशी मागणी करण्यात आली. शासनाने या मागणीची तातडीने दखल न घेतल्यास भविष्यात अधिक तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्याचा इशाराही आंदोलनकर्त्यांनी दिला.

या महाधरणे आंदोलनात तालुकाध्यक्ष अविनाश जावळे, किशोर जावळे, राहुल वाघमारे, मधुकर साळवे, विजय डावरे, राजू तुपारे, दिलीप भालेराव, रमेश तुपारे, अण्णा माने, बाबा देशमाने, भगवान ससाणे, मिलिंद नाकलगावकर, ओम सोनकांबळे, वामन पाईक, भारत डावरे, धम्मा पोटभरे, सिद्धार्थ तुपारे, हरिश जावळे, सिद्धार्थ खिल्लारे, कपिल जावळे, अनिल भराटे, अशोक भालशंकर, रामा जाधव, पप्पू साळवे यांच्यासह रिपाइं (आठवले)चे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध समाजघटकांतील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

तहसील कार्यालय परिसरात हे महाधरणे आंदोलन शांततेत पार पडले.

# शहीद जवानांचा पराक्रम भारतीयांना सदैव प्रेरणा देत राहील -माजी सैनिक केदार

बीड । प्रतिनिधी

मातृभूमी प्रतिष्ठान व ज्ञानसागर गुरुकुल यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २६ जुलै २०२६ रविवार रोजी कारगिल विजय दिनानिमित्त ज्ञानसागर गुरुकुल मध्ये देशभक्ती पूर्ण वातावरणात उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी वडझरी गावचे सुपुत्र कारगिल युद्धामध्ये शहीद झालेले जवान सुभाष सानप यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून शहीद सुभाष सानप सह कारगिलच्या युद्धात मातृभूमीच्या रक्षणासाठी मोठे शौर्य, धैर्य दाखवत सर्वोच्च बलिदान देणाऱ्या सर्व वीर जवानांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे माजी सैनिक बाजीराव केदार विद्यार्थ्यांशी संवाद साधताना म्हणाले की कारगिल युद्धामध्ये




ऑपरेशन विजय द्वारे २६ जुलै १९९९ रोजी भारतीय सैनिकांनी कारगिल मधील सर्व बर्फाच्छादित शिखरे शत्रूच्या ताब्यातून पूर्णपणे मुक्त केली आणि भारताचा तिरंगा फडकवला. या कारगिल युद्धामध्ये भारताचे जवळपास ६०० शूर जवान देश रक्षणासाठी शहीद झाले त्यांच्या स्मरणार्थ दरवर्षी २६ जुलै रोजी कारगिल विजय दिवस संपूर्ण भारतात साजरा करण्यात येतो. १५ गोळ्या लागूनही आणि गंभीर जखमी असताना सुभेदार योगेंद्र यादव यांनी टायगर हिलच्या चढाईत अभूतपूर्व पराक्रम गाजवला. त्यांच्या या साहसासाठी त्यांना भारताचे सर्वोच्च परमवीर चक्र मिळाले. रणरागिणी येशिका त्यागी, सुभाष सानप सह आदी वीर जवानांच्या पराक्रमा विषयी आठवणींना उजाळा देत विद्यार्थ्यांना त्यांनी थोडक्यात माहिती सांगत विद्यार्थ्यांना देशभक्ती, देशप्रेम,देशसेवा, आपले कर्तव्य, सैन्या मधील विविध करिअर संधी यावर देखील माजी सैनिक केदार यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच ज्येष्ठ समाजसेवक तथा मातृभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे, माजी मुख्याध्यापक दिनकर सानप, लेक लाडकी अभियान चे जिल्हा समन्वयक बाजीराव ढाकणे, सेवानिवृत्त ईपीएस कर्मचारी संघटनेचे सचिव सुदाम कोळेकर आदी मान्यवरांनी कारगिल विजय दिनाचे ऐतिहासिक महत्त्व,भारतीय सैन्याचे शौर्य,पराक्रम आणि देशासाठी दिलेल्या सर्वोच्च बलिदानाची माहिती देत उपस्थितांना राष्ट्रप्रेम व देश सेवेची प्रेरणा दिली. कार्यक्रमास बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक ज्ञानसागर गुरुकुलचे संचालक गणेश सानप तर आभार अमोल तोंडे यांनी मानले.

# प्रा. शुभांगी आंबले यांना पीएच.डी पदवी प्रदान

माजलगाव प्रतिनिधी

येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील प्रा. शुभांगी राजाभाऊ आंबले यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत वाणिज्य विषयात पीएच.डी प्रदान करण्यात आली आहे.



प्रा. शुभांगी राजाभाऊ आंबले यांनी प्रोफेसर डॉ. पी. एन.औटे यांच्या मार्गदर्शनाखाली ॲन नालिटिकल स्टडी ऑफ सप्लाय चेन मॅनेजमेंट ऑफ लार्ज फार्मास्युटिकल इंडस्ट्रीज ऑफ महाराष्ट्र या विषयावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात शोध प्रबंध सादर केला होता.

प्रा.शुभांगी आंमले यांच्या यशाबद्दल म.शि. प्र.मंडळाचे अध्यक्ष आ.प्रकाश सोळंके, सरचिटणीस आ.सतीश चव्हाण यांच्यासह महाविद्यालय विकास समिती सदस्य ॲड.बी.आर.डक, सत्यप्रकाश रुद्रवार, डॉ.बी.एल. चव्हाण, प्र.प्राचार्य डॉ. एन. के. मुळे,उपप्राचार्य डॉ.एम.ए.कव्हळे,उपप्राचार्य प्रकाश गवते, उपप्राचार्य पवन शिंदे, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.सचिन रुद्रवार, डॉ. बिलास काळे, डॉ. नितीन ढवळे यांच्यासह प्राध्यापक कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# आत्मविश्वास, संयम आणि संघटन कौशल्य या गुणावर उत्तम नेतृत्व बहरते - डॉ यशवंत राजेभोसले

माजलगाव । प्रतिनिधी

येथील श्री सिध्देश्वर माध्यमिक विद्यालयात विद्यार्थी नेतृत्व गुण विकास शिबिराच्या उदघाटन प्रसंगी डॉ यशवंत राजेभोसले बोलत होते यावेळी त्यांनी सांगितले की, नेतृत्व करण्यासाठी वयाची मर्यादा नसते उत्तम




नेतृत्व निर्माणासाठी आत्मविश्वास, संघटन कौशल्य, संयम आणि शिस्त हे सर्व गुण शालेय जीवनात अशा शिबिरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये रुजवली जातात. यावेळी त्यांनी मास्टर ब्लास्टर, भारतरत्न सचिन तेंडुलकर, शास्त्रज्ञ थॉमस एडिसन यांच्या जीवनातील प्रसंगाचा संदर्भ देऊन नेतृत्व गुणाविषयी अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले.

या शिबीराचे उदघाटन दीपप्रज्वलन, माता सरस्वती व पंच परिवर्तन प्रतिमेचे पूजन करून झाले. या सत्राचे अध्यक्ष भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड, श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलाचे कार्यवाह अड विश्वास जोशी, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, शिबीर निरीक्षक श्रीकांत देशपांडे, शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर इत्यादी उपस्थित होते.

या सत्राचे अध्यक्षीय समारोप करताना सांगितले की, विद्यार्थ्यांनी नेतृत्वासाठी आवश्यक असणारे गुण आत्मसात केले पाहिजे. आज आपल्या विद्यालयातील माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत नेतृत्व करत आहे. प्रास्ताविक करताना मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर यांनी सांगितले की, नेतृत्व गुण हे जन्मतः नसतात तर ते आत्मसात करून नेतृत्व साकारले जाते हे सांगताना त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, स्वामी विवेकानंद यांच्या जीवनाचे उदाहरण दिले. या सत्राचे सुत्रसंचालन कु. अपूर्वा गोरे हिने केले तर आभार अभ्यास पूरक मंडळ सह प्रमुख रोहित खिंडरे यांनी केले. यावेळी उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर सर, पर्यवेक्षक रवींद्र खोडवे, सदाशिव ढगे, कमलाकर झोडगे, परमेश्वर आदमाने, अभ्यास पूरक मंडळ प्रमुख प्रभाकर बनसोडे, सर्व शिक्षक उपस्थित होते.

# नाथ फाउंडेशनच्या शिबिरात १०३ हून अधिक रक्तदात्यांचा सहभाग

**थोरल्या पंढरीत रक्तदानातून मानवतेचा जागर**

वडवणी । प्रतिनिधी

आषाढी एकादशीच्या पावन निमित्ताने नाथ फाउंडेशन यांच्या वतीने प्रतिवर्षी प्रमाणे श्रीक्षेत्र.थोरले विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, पोखरी येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिरात १०३ हून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान करुन समाजाप्रती आपली जबाबदारी पार पाडली.

या शिबिरात युवक, महिला तसेच विविध क्षेत्रातील नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. विशेष म्हणजे चार पोलीस बांधवांनी रक्तदान करुन सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले, तर महिलांचाही उल्लेखनीय सहभाग या उपक्रमाचे विशेष आकर्षण ठरले यावेळी वडवणी येथील सौ.मीरा टकले व ईश्वर टकले तसेच सौ.माधुरी वाव्हळ व ज्ञानेश्वर वाव्हळ या दाम्पत्याने सलग दहा वर्षांपासून रक्तदान शिबिरात सहभाग नोंदवत सामाजिक सेवेचा आदर्श कायम ठेवला आहे. तसेच पोखरी येथील सौ.अर्चना सुरेश करांडे व त्यांच्या कुटुंबातील पाच सदस्यांनीही सलग दहा वर्षांपासून नियमित रक्तदान करुन समाजसेवेचा प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या या सातत्यपूर्ण योगदानाबध्दल उपस्थितांनी विशेष गौरव केला. या रक्तदान शिबिरासाठी सिटी ब्लड सेंटर यांनी मोलाचे सहकार्य केले. डॉ.बाळासाहेब शेंडगे व त्यांच्या संपूर्ण टीमने रक्त संकलन, वैद्यकीय तपासणी आणि शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी अथक परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला सामाजिक कार्यकर्ते अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी नाथ फाउंडेशनच्या समाजोपयोगी कार्याचे कौतुक करत रक्तदानासारख्या जिवनदायी उपक्रमात अधिकाधिक नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन केले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी नाथ फाउंडेशनचे अध्यक्ष संतोषकुमार तापडिया, डॉ.दिनकर बोंगाणे, धनंजय गुंदेकर, गोकर्ण करांडे, सतिष लांडे, प्रल्हाद बादाडे अशोक चव्हाण, प्रेम तापडिया सह पदाधिकारी, कार्यकर्ते, स्वयंसेवक तसेच प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्वांचे उपस्थितांनी अभिनंदन केले. रक्तदान हेच श्रेष्ठ दान हा संदेश देत समाजहिताचे असे उपक्रम भविष्यातही सातत्याने राबविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. नाथ फाऊंडेशनच्या वतीने सर्व पाहूणे, मान्यवर, रक्तदात्यांना चहा, फळे, उपवासाचा फराळ याची यथेच्छ व्यवस्था करण्यात आली होती.

# २५ लक्ष वृक्ष लागवड व संवर्धन अभियानाला वेग

## १०८ किमी नदीपात्रासह गावागावांत वृक्षलागवड जोमात

परळी । प्रतिनिधी

गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने हाती घेण्यात आलेल्या २५ लक्ष वृक्ष लागवड व संवर्धन महाअभियानाला मोठा प्रतिसाद मिळत असून, वृक्षलागडीचे काम वेगाने सुरू आहे. यावर्षी ट्रस्टने परळी, अंबाजोगाई, धारूर आणि माजलगाव तालुक्यातील पापनाशी, गुणवारा, वान, सरस्वती आणि लिंगी या नद्यांचे सुमारे १०८ किमी पुनरुज्जीवन केले असून, या नदीपात्रांच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड केली जात आहे. त्याचबरोबर विविध गावांमध्ये रोपांचे वितरण करण्यात आल्याने सार्वजनिक ठिकाणे, मोकळ्या जागा आणि शेतांच्या बांधावरही लागवड सुरू आहे.



या अभियानाचा शुभारंभ ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी यांच्या हस्ते परळी वैजनाथ येथे झाला. या उपक्रमात अनेक नगरपालिकांसह १०० हून अधिक ग्रामपंचायती, सामाजिक संस्था आणि हजारो नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला आहे. गेल्या तीन दिवसांतच २५ लाखांहून अधिक वृक्षांची लागवड झाल्याने प्रारंभीचे २५ लाखांचे उद्दिष्ट ओलांडून ५० लाख वृक्ष लागवडीचा टप्पा गाठण्याची शक्यता निर्माण झाली आहे. वृक्षलागवडीसोबतच त्यांच्या संवर्धनासाठीही नियोजनबद्ध उपाययोजना करण्यात येत आहेत.

अभियानाच्या तिसऱ्या दिवशी पिंपळगाव गाढे, कासारवाडी, जळगव्हाण, परचुंडी आदी गावांतील नदीपात्रांमध्ये वृक्षलागवड करण्यात आली. तसेच परळी वैजनाथ, सोनपेठ आणि वडवणी नगरपरिषद क्षेत्रात घनदाट वृक्षलागवड सुरू असून, सहभागी ग्रामपंचायतींनाही मोठ्या प्रमाणावर रोपे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. आषाढी एकादशीच्या निमित्ताने ग्लोबल विकास ट्रस्टच्या कृषीकुल शेतकरी प्रशिक्षण केंद्रात कृषेश्वर महादेव मंदिरात महापूजा आयोजित करण्यात आली. जलनायक मयंक गांधी आणि मीनल गांधी यांच्या हस्ते ही पूजा संपन्न झाली. त्यानंतर विवेकानंद पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी कृषीकुल परिसरात वृक्षदिंडी काढून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. या उपक्रमात विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिकांनी उत्साहाने सहभाग घेतला.


## कीटकनाशक फवारतांनाची खबरदारी

शेतीसाठी कीटकनाशके ही खूप महत्त्वाची आणि अविभाज्य घटक आहेत. कोणतेही पीक असले तरी त्या पिकानुसार आणि त्यावर पडणाऱ्या रोगानुसार कीटकनाशके वापरावी लागतात. कीटकनाशक कमी वापरली आणि जास्त वापरली तरीही त्याचे वेगवेगळे परिणाम पिकावर होताना दिसतात. यासोबतच, कीटकनाशके विषारी आणि मौल्यवान असल्यामुळे याचा वापर प्रमाणात होणे गरजेचे आहे. तसेच, जास्त कीटकनाशके वापरल्यानंतर तो शेतीमाल बाजारामध्ये अथवा परदेशांमध्ये विकणेही कठीण होऊन जाते. त्यामुळे कीटकनाशके वापरतांना काही खबरदारी घेणे गरजेचे आहे.

आपल्या शेतामधील पिक आणि त्या पिकावरील पडलेले अथवा संभाव्य रोग यांचा अंदाज घेऊन कोणती कीटकनाशके वापरायची हे प्रथमता ठरवणे गरजेचे आहे. जर, आपल्याला या गोष्टीमधील पूर्ण ज्ञान नसेल तर, स्थानिक तज्ञ अथवा शासकीय कृषी अधिकारी यांच्याकडून मार्गदर्शन घेणे महत्त्वाचे आहे. कीटकनाशक मारण्याची योग्य वेळ आणि त्याचे प्रमाण समजून घेतले पाहिजे. कीटकनाशकांची शुद्धता दाखवण्यासाठी कीटकनाशकांच्या बाटलीवर हिरव्या निळ्या आणि पिवळ्या किंवा लाल रंगाचे चिन्ह दाखवले जाते. लाल रंगाचे चिन्ह असलेले कीटकनाशक अतिशय विषारी असून, ते सस्तन प्राण्यांवर जास्त नुकसान देतात. हिरव्या रंगाचे कीटकनाशक कमी आणि हानीकारक आहेत.कीटकनाशक खरेदी करताना त्यावर असलेली उत्पादन तारीख व एक्सपायरी डेट तारीख पाहणे अतिशय गरजेचे आहे. जर मुदत संपलेले औषध- कीटकनाशक आपण पिकांवर मारले तर, त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो. यामुळे शेतकऱ्यांवर त्याचा आर्थिक परिणाम होतो. प्रत्येक कीटकनाशकांसोबत ते वापरण्याची आणि हाताळण्याची पद्धती लिहुन आलेली असते. ती काळजीपूर्वक वाचावी. किटकनाशकांची साठवणूक स्वच्छ हवेशीर आणि कोरड्या जागी करावी. कीटकनाशक फवारताना शेतकऱ्याने संपूर्ण अंग झाकेल असे कपडे घालणे गरजेचे आहे. हातामध्ये रबराचे हातमोजे, तोंडावर मास्क आणि डोळ्याच्या संरक्षणासाठी चष्मा घालणे आवश्यक आहे. फवारणीच्या वेळी जर वारा जास्त असेल तर, फवारणी करणे टाळावे.

## दशपर्णी अर्क : उत्तम नैसर्गिक कीटकनाशक

दशपर्णी अर्क हे नैसर्गिक कीटकनाशक असूनहेशेतकऱ्यांसाठी खूप फायदेशीर आहे व शेतीचा खर्च यामुळे नक्कीच कमी होऊ शकतो.रासायनिक कीटकनाशकांचा वापर केल्यास ते आरोग्यास खूप हानिकारक आहे. त्यामुळे जर आरोग्यावर होणारे वाईट परिणाम व शेतीचा खर्च कमी करण्यासाठी नक्कीच सर्व शेतकऱ्यांनी या दशपर्णी अर्काचा वापर कीटकनाशक म्हणून केला पाहिजे. शेतकऱ्यांनी हे जैविक कीटकनाशक स्वतः तयार करावे.



कीटकनाशक बनवण्यासाठी लागणारे साहित्य :२०० लिटर टाकी. कडूनिंब व निंबोळ्या पाला - ५ किलो. रुई पाला २ किलो. धोतरा पाला -२ किलो. एरंडपाला - २ किलो. बिलायत पाला - २ किलो. गुळवेल पाला - २ किलो. निरगुडी पाला -२ किलो. घाणेरी पाला २ किलो. कनेरी पाला - २ किलो. करंजी पाला २ किलो. बाभूळ पाला २ किलो. बेशरम पाला - २ किलो. सीताफळाचा पाला २ किलो. पपई चा पाला २ किलो.

कृती :यापैकी कडूनिंब, गारवेल, रुई, करंजी, सीताफळाचा पाला महत्वाचे, बाकीचे सर्व उपलब्ध असतील त्यानुसार घेणे. सर्व मिळून १० वनस्पती घेणे गरजेचे आहे. हे सर्व २०० लीटर टाकीमध्ये पाणी घेऊन त्यात वरील सर्व वनस्पती बारीक करून घेणे साधारण वीस दिवस घड्याळाच्या काट्याप्रमाणे ढवळणे. ३० दिवसानंतर उग्र वास आल्यानंतर १६ लिटर पाण्याला २०० मिली फवारणी साठी वापरता येईल. कीटकनाशक मावा, तुडतुडे, थ्रिप्स, अळीयांच्यावर प्रभावी काम करते. याची फवारणी शक्यतो दर आठ दिवसाला करावी.

प्रमाण :१६ लिटर पंपासाठी २०० मिली. याचबरोबर काही जिवाणू तसेच बुरशी प्रमाणित प्रयोगशाळेतून आणावे लागतात. उदा. व्हर्टिसिलियम लूकानी,बिव्हेरिया, मायक्रोराईजा, मेटारायझियम. यांची विक्री दर वेगळे उपलब्ध आहेत.( प्रयोगशाळे वर अवलंबून आहे). अशाप्रकारच्या निविष्ठा वापरल्यास खर्चात बचत होते व उत्पादनात दोन टक्के वाढ होते. हा माझा अनुभव आहे मित्रहो निसर्गाने आपल्याला भरपूर काही दिले आहे त्याचा वापर करणे हे आपल्याच हाती आहे.म्हणून जैविक शेती करा, विषमुक्त शेती करा, नैसर्गिक शेती करा कारण की हाच विषय खिशाला आणि आरोग्याला सांभाळतो. त्यासाठी स्वतः बनविणे शिका कोणत्याही रासायनिक किंवा जैविक किंवा सेंद्रिय कंपनीकडून स्वतःची किंवा आपल्या मित्राची लूट होऊ देऊ नका सर्व शेतकरी बांधवांना पर्यंत ही माहिती पोहचवा ही विनंती.री

## चुनखडी जमिनीतूनही मिळू शकते चांगले उत्पन्न

चुनखडीयुक्त जमिनीचा सामू अल्कलीधर्मी असतो. यामध्ये विद्राव्य स्वरूपातील कार्बोनेट आणि बायकार्बोनेटचे प्रमाण जास्त असून सामू सर्वसाधारणपणे ७.५ ते ८.५ असतो. सामू ८.५ च्या वर शक्यतो जात नाही. जर सोडियमचे प्रमाण जास्त झाले तर सामू ८.५ च्या वर जाण्याची शक्यता असते. चुनखडीयुक्त जमिनीचा सामू वाढल्यामुळे काही अन्नद्रव्यांचा जमिनीतून ऱ्हास होतो, तर काही अन्नद्रव्ये इतर संयुगांना बांधले जाऊन पिकांना उपलब्ध होत नाहीत. चुन्यामुळे प्रत्यक्ष, तसेच अप्रत्यक्षरीत्या नत्र, स्फुरद, मॅग्नेशियम, पालाश, मँगेनीज, जस्त, तांबे आणि लोह यांच्या उपलब्धतेवर विपरीत परिणाम होतो. सर्वसाधारणपणे पिकांच्या मुळाच्या भोवती आम्लधर्मी वातावरण असते, तसेच द्विदल धान्य मुळाद्वारे हायड्रोजन सोडून मुळाभोवती वातावरण आम्लधर्मी ठेवतात. चुनखडीयुक्त जमिनीत या क्रियेत बदल होऊन पिकांच्या मुळांची वाढ योग्य प्रकारे होत नाही. यामुळे लोहासारख्या अन्नद्रव्याची कमतरता प्रकर्षाने जाणवायला लागते. कारण लोह आम्लधर्मी वातावरणात जास्त उपलब्ध असते आणि अल्कलीधर्मी वातावरणात लोहाची उपलब्धता कमी होते. या क्रियेमध्ये कार्बोनेटचा सहभाग जास्त होऊन लोह पिकास उपलब्ध होत नाही.



चुनखडीयुक्त जमिनीमध्ये नत्राचे व्यवस्थापन : चुनखडीयुक्त जमिनी अल्कलीधर्मी असल्यामुळे नत्राचे रूपांतर होण्याच्या गतीवर अनिष्ट परिणाम होतो. जमिनीतील नायट्रोसोमोनस, नायट्रोबॅक्टरसारखे जिवाणू नत्राचे अमोनिया स्वरूपामध्ये रूपांतर करतात. नायट्रेट स्वरूपातील नत्र पिके शोषून घेतात. म्हणून ही क्रिया अत्यंत महत्त्वाची आहे. नायट्रिफिकेशन ही क्रिया जमिनीचा सामू ७ ते ८ च्या दरम्यान असल्यास जास्त गतीने होते. जमिनीचा सामू जर ५ ते ७.५ च्या दरम्यान असेल तर अमोनियमयुक्त नत्र खताचा वापर फायदेशीर ठरतो. परंतु जमिनीमध्ये कार्बोनेटचे प्रमाण अधिक असल्याने अमोनियम खताचा परिणाम दिसून येत नाही. उलटपक्षी नत्राचा ऱ्हास होऊन नुकसान होते. जमिनीतील कॅल्शियम कार्बोनेटसोबत अमोनियमची प्रक्रिया होऊन अमोनियम कार्बोनेट तयार होते. यातील अमोनियम कार्बोनेटचे रूपांतर अमोनिया वायू, पाणी आणि कर्बवायूमध्ये होते आणि नत्राचा ऱ्हास होतो. त्यामुळे अमोनियम सल्फेट, अमोनियम फॉस्फेटसारख्या खताचा वापर चुनखडीयुक्त जमिनीत करू नये. त्याऐवजी अमोनियम नायट्रेट, अमोनियम क्लोराइडयुक्त खतांचा वापर करावा. अर्थात क्लोराइडचे जमिनीतील प्रमाण तपासून या खताचा वापर हितावह ठरतो. चुनखडीयुक्त जमिनीमध्ये लोहाची कमतरता असते. त्यामुळे मुळांच्या वाढीमध्ये लेगहिमोग्लोबिन पदार्थ कमी तयार होतात. या लेगहिमोग्लोबिनमुळेच हवेतील नत्र मुळावरील गाठीमध्ये साठविले जाते. नत्र खतांचा वापर काळजीपूर्वक केला पाहिजे. नत्र खतांचे रूपांतर अमोनिया वायूमध्ये होऊन ऱ्हास टाळण्यासाठी खते जमिनीच्या पृष्ठभागावर न राहता ताबडतोब मातीत मिसळली जावीत. त्यासाठी जमिनीत योग्य ओलावा असणे अथवा खते दिल्यावर जमिनीस पाणी देणे महत्त्वाचे ठरते. तसेच अमोनियाद्वारे होणारा नत्राचा ऱ्हास टाळण्यासाठी युरिया हा म्युरेट ऑफ पोटॅश, कॅल्शियम क्लोराइड किंवा ट्रिपल सुपर फॉस्फेट खतासोबत मिसळून द्यावा. तसेच दाणेदार युरिया, गंधकाचे आवरण असलेला युरिया व निमावरण असलेल्या युरियाच्या वापराने नत्र खताची उपयोगिता वाढविता येते.

चुनखडीयुक्त जमिनीमध्ये स्फुरदाचे व्यवस्थापन :जमिनीतील स्फुरद किंवा खताद्वारे दिलेल्या स्फुरदाची उपलब्धता जमिनीचा सामू ६ ते ७.५ च्या दरम्यान असताना अधिक असते. चुनखडीयुक्त जमिनीचा सामू ७.५ पेक्षा जास्त असल्याने पिकांना पुरेसा स्फुरद उपलब्ध होत नाही. स्फुरदाचे रूपांतर अत्यंत कमी विद्राव्य अशा फॉस्फेट, मॅग्नेशियम फॉस्फेट या संयुगामध्ये होते. यालाच स्फुरदाचे स्थिरीकरण म्हणतात. फॉस्फेट संयुग पोयट्याच्या कणांवर किंवा चुन्याच्या कणांवर बसते आणि त्याचा डाय कॅल्शियम फॉस्फेट, ऑक्टॅकॅल्शियम फॉस्फेट संयुगाच्या रूपाने साका तयार होतो. ज्या प्रमाणात जमिनीचा सामू वाढत जातो, त्या प्रमाणात संयुगे होण्याची क्रिया वाढते. स्फुरद पिकांना उपलब्ध होत नाही. त्यासाठी स्फुरद खतांची मात्रा वाढविणे आणि जमिनीस स्फुरद विद्राव्य जिवाणूंचा पुरवठा करणे हा पर्याय उरतो. सतत किंवा नेहमी चुनखडी जमिनीत सुपर फॉस्फेट, डाय अमोनियम फॉस्फेटसारख्या खतातून स्फुरद देणे योग्य नाही. कारण त्यांची विद्राव्य क्षमता ही अत्यंत कमी असते. उलटपक्षी त्यांचे स्थिरीकरणच जास्त होते. चुनखडीयुक्त जमिनीमध्ये स्फुरद खते दाणेदार स्वरूपात, तसेच सेंद्रिय खतासोबत दिल्याने स्फुरदयुक्त खतांची उपयोगिता वाढते.या पद्धतीमुळे खतांचा जमिनीतील कणांशी कमी संपर्क व संयोग होतो आणि अविद्राव्यता कमी होते.

पालाश आणि मॅग्नेशियमचे व्यवस्थापन :उपलब्ध पालाश आणि मॅग्नेशियम चुनखडीयुक्त जमिनीमध्ये पुरेशा प्रमाणात दिसून येतात. कारण या जमिनी तयार होत असतानाच खनिजांची झीज होऊन विनिमयक्षम पालाश आणि मॅग्नेशियमची भर पडते. कमी पावसामुळे पाण्याद्वारेही अन्नद्रव्ये वाहून जात नाहीत. परंतु मॅग्नेशियम, कॅल्शियम आणि पालाश या अन्नद्रव्यामध्ये असमतोल होऊन मॅग्नेशियम व पालाशची कमतरता पिकांमध्ये दिसून येऊ शकते. याचे प्रमुख कारण जमिनीमध्ये कॅल्शियमचे प्रमाण, पालाश व मॅग्नेशियमपेक्षा जवळपास ८० टक्के जास्त असल्यामुळे आणि मॅग्नेशियमचे प्रमाण अंदाजे फक्त ४ टक्के असल्याने मॅग्नेशियम व पालाशचे शोषण कॅल्शियमच्या तुलनेत कमी होते आणि पिकांमध्ये या मूलद्रव्यांची कमतरता दिसून येते. चुनखडीयुक्त जमिनीमध्ये पालाशचे प्रमाण सर्वसाधारणपणे जास्त असले तरीही पालाश अन्नद्रव्याची कमतरता सद्यःस्थितीमध्ये दिसून येत आहे. पालाश अन्नद्रव्याच्या वापरास पीक प्रतिसाद देत असल्याचे दिसते. इतर मॅग्नेशियमयुक्त खते देऊन पानातील मॅग्नेशियमचे प्रमाण चुनखडीयुक्त जमिनीमध्ये वाढवता येत नाही. त्यासाठी पालाश, मॅग्नेशियम सल्फेटसारखी विद्राव्य खते फवारणीद्वारे वापरणे जास्त हितावह आहे.

याकडेही द्या लक्ष : चुनखडीयुक्त जमिनीत अन्नद्रव्यांच्या व्यवस्थापनासाठी मातीचा योग्य नमुना घेऊन मातीपरीक्षण करून घेणे व त्यानुसार खतांचा वापर करणे अत्यंत आवश्यक आहे. चुनखडीयुक्त जमिनीमध्ये अमोनियमयुक्त व युरिया खते ताबडतोब मुळाशी गेली पाहिजेत. त्यासाठी जमिनीमध्ये ओलावा नसेल तर खते दिल्यानंतर पाणी देणे अत्यंत आवश्यक आहे. चुनखडीयुक्त जमिनीमध्ये स्फुरदाची योग्य मात्रा नियमितपणे पिकांना देणे गरजेचे आहे. त्यासाठी स्फुरद विद्राव्य जिवाणूंचा वापर फायदेशीर ठरतो. चुनखडीयुक्त जमिनीमध्ये पिकांना मॅग्नेशियम व पालाशची गरज भासते. त्यासाठी मॅग्नेशियम सल्फेट आणि पोटॅशियम नायट्रेटची फवारणी फायद्याची ठरते. जस्त आणि मँगेनीजची कमतरता कमी करण्यासाठी या अन्नद्रव्यांची खताद्वारे (०.५ टक्के) दोन ते तीन वेळा फवारणी करावी. चुनखडीयुक्त जमिनीत लोहाच्या कमतरतेचा अनिष्ट परिणाम कमी करण्यासाठी लोहाची (१ ते २ टक्के) फवारणी फायदेशीर आहे. गंधक आणि गंधकयुक्त अन्नद्रव्यांची उपलब्धता वाढते. सेंद्रिय पदार्थांचा- उदा. कंपोस्ट, शेणखत इत्यादी- वापर केल्याने चुन्याची दाहकता कमी होऊन अन्नद्रव्य उपलब्धतेमध्ये वाढपदार्थाचा वापर करावा.




### महत्वाच्या घटना

१७६१ : माधवराव बल्लाळ भट ऊर्फ 'थोरले' माधवराव हे मराठा साम्राज्यातील ४ थे पेशवे बनले.

१८६६ : आयर्लंडच्या व्हॅलेन्शिया द्वीपापासून कॅनडातील ट्रिनिटी बेपर्यंत समुद्राखालील तार घालण्याचे काम पूर्ण. युरोप अमेरिकेच्या दरम्यान तारसंदेश पाठवणे शक्य झाले.

१८९० : डच चित्रकार व्हिन्सेंट व्हॅन गॉगने स्वत:वर गोळी झाडुन घेतली. दोन दिवसांनी त्याचे निधन झाले.

१८९७ : बाळ गंगाधर टिळक यांना पहिल्यांदा कैद करण्यात आलं.

१९२१ : रक्तातील साखरेवर 'इन्सुलिन' या संप्रेरकाचे नियंत्रण असते असे टोरांटो विद्यापीठातील सर फ्रेड्रिक बँटिंग आणि चार्ल्स बेस्ट यांनी सिद्ध केले. तसेच त्यांनी 'इन्सुलिन' शुद्ध स्वरुपात विभक्त करण्यात यश मिळवले.

१९४० : ॲनिमेट शॉर्ट फिल्म ए जंगली हेअर मधून बग्स बनी हे पात्र प्रकाशित झाले.

१९४९ : पहिल्या प्रवासी जेट विमान, डी हॅविललँड कॉमेटचे पहिले उड्डाण.

१९५५ : दोस्त राष्ट्रांनी ऑस्ट्रियातुन आपले सैन्य काढुन घेतले.

१९८३ : कोलंबो येथील वेलिकाडा तुरुंगात सिंहली कैद्यांनी १८ तामिळ राजकीय कैद्यांची हत्या केली.

१९८७ : पुरातत्व विभागाच्या संशोधकांना टायटॅनिक जहाजाचा मलबा सापडला.

१९९७ : तामिळनाडुचे मुख्यमंत्री आणि द्रमुकचे अध्यक्ष एम. करुणानिधी यांची सलग सातव्यांदा पक्षाच्या अध्यक्षपदी निवड झाली. हा एक विक्रम आहे.

१९९९ : द्रवखनिज तेलवायूचा वाहनांसाठी इंधन म्हणून वापर करण्याचा प्रस्ताव पेट्रोलिअम मंत्रालयाने मंजूर केला.

२००१ : सार्वजनिक ठिकाणे, शासकीय इमारती, सार्वजनिक वाहने या ठिकाणी सिगारेट, तंबाखू, गुटखा सेवनावर व थुंकण्यावर तसेच या वस्तूंची सार्वजनिक ठिकाणी जाहिरात करण्यावर बंदी घालण्याचा महाराष्ट्र मंत्रीमंडळाचा निर्णय

२०१२ : लंडन येथे ३० व्या येथे ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६६७ : योहान बर्नोली स्विस गणितज्ञ (मृत्यू: १ जानेवारी १७४८)

१७२४ : राजस्थान मधील मेवाड प्रांताचे शासक महाराणा प्रतापसिंह द्वितीय यांचा जन्मदिन.

१८९९ : ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू पर्सी हॉर्नी ब्रूक यांचा जन्म.

१९११ : डॉ. पांडुरंग वासुदेव तथा पां. वा. सुखात्मे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे संख्याशास्त्रज्ञ व आहारतज्ञ, पद्मभूषण (१९७१) (मृत्यू: २८ जानेवारी १९९७)

१९१३ : भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या कार्यकर्त्या कल्पना दत्त यांचा जन्मदिन.

१९१५ : ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू जॅक आयव्हरसन यांचा जन्म.

१९४० : भारतीय वंशीय अमेरिकन लेखिका व कादंबरीकार भारती मुखर्जी यांचा जन्मदिन.

१९५० : ग्रामी पुरस्कार सन्मानित उत्कृष्ट हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत वीणा वादक व्ही. एम. भट्ट यांचा जन्मदिन.

१९५४ : भारतीय वकील आणि राजकारणी जी.एस. बाली यांचा जन्म.

१९५५ : ॲलन बॉर्डर ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू

१९६३ : पाकिस्तानी क्रिकेट खेळाडू नवेद अंजुम यांचा जन्म.

१९६७ : भारतीय अभिनेते, दिग्दर्शक, आणि पटकथालेखक राहुल बोस यांचा जन्म.

१९६९ : दक्षिण आफ्रिका क्रिकेट संघातील माजी क्रिकेटपटू व मुंबई इंडियन संघाचे प्रशिक्षक जोंटी रोड्स यांचा जन्मदिन.

१९८३ : भारतीय फुटबॉल खेळाडू सॉकर वेल्हो यांचा जन्म.

१९९० : भारतीय हिंदी चित्रपट अभिनेत्री कृती सॅनॉन यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८४४ : जॉन डाल्टन इंग्लिश भौतिक व रसायनशास्त्रज्ञ (जन्म: ६ सप्टेंबर १७६६)

१८९५ : उस्ताद बंदे अली खाँ बीनकार, किराणा घराण्याचे प्रवर्तक, सूक्ष्म स्वरांचे भान असणारे व मधुर वादन करणारे असा त्यांचा लौकिक होता. पुण्यात नव्या पुलाजवळील दर्ग्याच्या परिसरात उस्ताद बंदे अली खाँ यांची कबर आहे. (जन्म: )

१९३५ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाबाई आंबेडकर यांचे निधन.

१९७५ : त्र्यं. र. ऊर्फ मामासाहेब देवगिरीकर गांधीवादी नेते, खासदार. भारतीय राज्यघटनेचे मराठीत भाषांतर करुन २६ जानेवारी १९५० रोजीच ते वाचकांच्या हातात देण्याचे काम त्यांनी केले. (जन्म:)

१९८० : मोहम्मद रझा पेहलवी इराण देशाचे शेवटचे शासक व शाह ऑफ इराण म्हणून प्रसिद्ध (जन्म: २६ आक्टोबर १९१९)

१९९२ : अमजद खान हिन्दी चित्रपटसृष्टीतील नावाजलेले खलनायक (जन्म: १२ नोव्हेंबर १९४० गझनी, अफगाणिस्तान)

१९९७ : बळवंत लक्ष्मण वष्ट हिंदुत्त्ववादी कार्यकर्ते

२००२ : कृष्णकांत भारताचे १० वे उपराष्ट्रपती (जन्म: २८ फेब्रुवारी १९२७)

२००७ : वामन दत्तात्रय पटवर्धन स्फोटके व शस्त्रास्त्र तज्ञ (जन्म: ३० जानेवारी १९१७)

२०१५ : भारताचे ११ वे राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे निधन. (जन्म: १५ ऑक्टोबर १९३१). भारतीय सर्वोत्कृष्ट पुरस्कार भारतरत्न, तसचं, पद्मभूषण व पद्म विभूषण पुरस्कार सन्मानित ''मिसाईल मॅन'' म्हणून प्रसिद्ध भारतीय वैज्ञानिक व माजी भारतीय राष्ट्रपती

राज्य लोकतंत्र



# मराठवाडा वृत्तांत



# आश्रमशाळांतील संस्थाचालकांच्या मनमानी व भ्रष्ट कारभाराविरोधात सामाजिक न्याय भवनासमोर निदर्शने

## कर्मचाऱ्यांची शारीरिक, मानसिक व आर्थिक पिळवणूक होत असल्याचा आरोप; उच्चस्तरीय ऑडिट, ऑनलाइन हजेरी व दोषींवर कारवाईची मागणी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत चालणाऱ्या आश्रमशाळांमधील अनागोंदी कारभार, आर्थिक गैरव्यवहार आणि शिक्षक-कर्मचाऱ्यांच्या शारीरिक आणि मानसिक छळाविरोधात सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२७ सोमवारी रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे निदर्शने करण्यात आली. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री सुनेत्रा पवार आणि इतर मागास व बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांना निवेदन सादर करण्यात आले. जिल्ह्यातील ४५ आश्रमशाळांमध्ये सुमारे ७५० शिक्षक व कर्मचारी कार्यरत असून




अनेक संस्थांमध्ये संस्थाचालक व त्यांच्या कुटुंबीयांचे वर्चस्व आहे. काही ठिकाणी अध्यक्ष, मुख्याध्यापक, शिक्षक आदी पदांवर एकाच कुटुंबातील सदस्य असल्याने आश्रमशाळा ''प्रायव्हेट लिमिटेड कंपनी''प्रमाणे चालवल्या जात असल्याचा आरोप डॉ . गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला.

१) सर्व आश्रमशाळांचे उच्चस्तरीय ऑडिट व ऑनलाइन हजेरी आश्रमशाळांमधील कारभारात पारदर्शकता आणण्यासाठी विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची ऑनलाइन हजेरी सुरू करावी तसेच सर्व आश्रमशाळांचे उच्चस्तरीय समितीकडून विशेष ऑडिट करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली. २) अंथरवणपिंप्री तांडा प्रकरणाची चौकशी गेवराई तालुक्यातील अंथरवणपिंप्री तांडा येथील आश्रमशाळेतील महिला कर्मचारी सुरेखा विष्णू चव्हाण यांना कायदेशीर वेतनाची मागणी केल्यामुळे मानसिक, आर्थिक व शारीरिक छळ करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला. तसेच त्यांच्या पतीवर संस्थेच्या सचिवांनी मारहाण केल्याचा आरोप करत संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. ३) वडझरी आश्रमशाळेतील कथित आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी पाटोदा तालुक्यातील वडझरी येथील आश्रमशाळेत पटसंख्येबाबत अनियमितता, शिक्षक मान्यतेतील कथित नियमभंग, वेतन अपहार व शासनाची फसवणूक झाल्याचा आरोप करत संबंधितांवर गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. ४) सहाय्यक संचालकांवर कारवाईची मागणी संस्थाचालकांची कथित पाठराखण करून कारवाईस विलंब केल्याचा आरोप करत इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या बीड येथील सहाय्यक संचालकांवर प्रशासकीय कारवाई करून संबंधित प्रकरणांची तटस्थ चौकशी करण्याची मागणी करण्यात आली. आंदोलनात माहिती अधिकार कार्यकर्ते शेख युनुस, शेख मुबीन, शिवशर्मा शेलार, हनुमान घोडके, किष्किंधा पांचाळ,बाळासाहेब मोरे पाटील ( शिवशक्ती भिमशक्ति विचारमंच प्रदेशाध्यक्ष), माजी सैनिक अशोक येडे( जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी बीड), प्राचार्य डी.जी.तांदळे ( मार्गदर्शक मराठवाडा शिक्षक संघ बीड), नितीन जायभाये ( अध्यक्ष बीड शहर बचाव मंच), बाजीराव ढाकणे,सुहास जायभाये,ज्येष्ठ सामाजसेवक डॉ.संजय तांदळे, किसन पुंड (राज्य सरचिटणीस, महाराष्ट्र आश्रमशाळा शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी महासंघ),धनंजय सानप (बीड जिल्हाध्यक्ष महाराष्ट्र आश्रमशाळा शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी महासंघ), पवार बी.एच.( जिल्हाध्यक्ष हिंगोली महाराष्ट्र शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी महासंघ), जमजाळ आर.डी.( प्रसिद्ध प्रमुख महाराष्ट्र आश्रमशाळा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी महासंघ), सहशिक्षक,संजय जायभाये, अशोक सानप, मच्छिंद्र आंधळे, राहुल थिटे,नेवळे प्रदीप, कालिदास वनवे, सतिश राठोड यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले.

# मंत्री पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर

पाथर्डी । प्रतिनिधी

पर्यावरण व हवामान बदल पशुसंवर्धन मंत्री व भाजपच्या नेत्या पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त जय जवान जय किसान कृषी सेवा केंद्राचे संकेत कीर्तने यांच्या नेतृत्वात खरवंडी खासदार येथील लोकनेते गोपीनाथ मुंडे चौकात रक्तदान शिबिर संपन्न झाले मंत्री पंकजा मुंडे यांच्या आव्हानुसार सामाजिक उत्तरदायित्व वंचित पीडित ऊसतोड मजूर घटकांच्या संवेदना जपण्यासाठी शालेय साहित्य जीवनावश्यक वस्तू धान्य किराणा वाटप करणे किंवा पर्यावरणाचे संरक्षण जतन व संवर्धन करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्ष



लागवड करणे तसेच माणुसकीचा धर्म म्हणून एखाद्या रुग्णाचे प्राण वाचवण्यासाठी रक्तदान श्रेष्ठ असू शकते या उद्देशाने संकेत कीर्तने यांनी खरवंडी कासार येथील तरुणांच्या मदतीने रक्तदान शिबिर संपन्न केले या रक्तदान शिबिरात किशोर दराडे सोमनाथ दराडे विजय कीर्तने सचिन पालवे गौतम दराडे रामदास कीर्तने मिठू पालवे यांनी सहभाग नोंदवला.

# आषाढी एकादशीनिमित्त फ्लाईंग बड्र्स अकॅडमीत भक्तिमय दिंडी सोहळा

पाथर्डी । प्रतिनिधी

आषाढी एकादशीचे औचित्य साधून फ्लाईंग बड्र्स अकॅडमी इंग्लिश मीडियम स्कूल येथे विठ्ठल भक्तीने ओतप्रोत भरलेला दिंडी सोहळा आणि सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला संपूर्ण परिसर विठ्ठल विठ्ठल च्या जयघोषाने दुमदुमून गेला यामुळे भक्तिमय वातावरणात विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे अप्रतिम दर्शन घडविले कार्यक्रमाची सुरुवात पाथर्डी पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक विशाल लहाने यांच्या हस्ते विठ्ठल-रुक्मिणी यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

यावेळी शाळेचे पालक शिक्षक व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमात नर्सरी ते इयत्ता



दहावीपर्यंतच्या सुमारे ५०० विद्यार्थी विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला विद्यार्थ्यांनी पारंपरिक वारकरी वेशभूषेत दिंडी काढत विठ्ठल नामाचा गजर केला लेझीम पथक ढोल पथक टाळ-मृदुंगाच्या गजरात सादर केलेली पावली रिंगण आणि विविध भक्तिमय सादरीकरणांनी उपस्थितांची मने जिंकली विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध आणि आकर्षक सादरीकरणामुळे संपूर्ण परिसरात पंढरपूरच्या वारीचा अनुभव सर्वांना अनुभवता आला विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कार्यक्रमाला पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत टाळ्यांच्या गजरात कौतुक केले विद्यार्थ्यांमधील संस्कार भारतीय संस्कृती वारकरी परंपरा आणि भक्तीची भावना जोपासण्याचा हा उपक्रम अत्यंत प्रेरणादायी ठरल्याची भावना उपस्थित पालकांनी व्यक्त केली या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करून त्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान लाभले.

# चकलांबा येथे प्रयास फाउंडेशनतर्फे विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्याचे वाटप

चकलांबा । प्रतिनिधी

प्रयास फाउंडेशन, मुंबई आणि गुरू आनंद महिला प्रतिष्ठान बीड यांचे संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद प्राथमिक कन्या कन्या शाळेत चकलांबा केंद्रातील १८ शाळेत मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

या प्रतिष्ठान च्या सहकार्याने गोरबरीब मुलांना मदत मिळाली ही खूप महत्वाची मदत आहे..कार्यक्रमास गुरु आनंद महिला प्रतिष्ठानचे अध्यक्ष सीमा मनोज ओस्तवाल यांची प्रमुख उपस्थिती होती. तर अध्यक्ष स्थानी सतीश घाडगे पाटील यांची उपस्थिती होती. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे माजी जिल्हा परिषद सदस्य डॉ. विजयकुमार घाडगे, परमेश्वर वाघमोडे, यांनी या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करुन शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाच्या प्रस्ताविक भाषणात संदीप रोकडे यांनी कार्यक्रमाची रुपरेषा व्यक्त केली.प्रयास फाउंडेशन, मुंबई आणि गुरू आनंद महिला प्रतिष्ठान बीड यांचे संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद प्राथमिक कन्या कन्या शाळेत चकलांबा केंद्रातील १८ शाळेत मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख



पाहुणे माजी जिल्हा प कार्यक्रमाच्या प्रस्ताविक भाषणात ड. संदीप रोकडे यांनी कार्यक्रमाची रुपरेषा व्यक्त केली. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना आपल्या विनोदी शैलीत मार्गदर्शन केले. सामाजिक कार्यकर्त्या तथा गुरु आनंद प्रतिष्ठानचे अध्यक्ष सीमा ओस्तवाल यांनीही विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. यावेळी सामाजिक परिवर्तन प्रतिष्ठानचे विश्वस्त तथा कार्यक्रमाचे आयोजक डी डी. रोकडे आणि ड. संदीप रोकडे आदींनी उपस्थित सर्वांचे शाल श्रीफळ पुष्पहार देऊन स्वागत केले. कार्यक्रमास जिल्हा परिषद माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक बी. एल. गरकळ, सानप, डोंगरे, बांगर, शिरसाठ, बडे , शेख,भाऊसाहेब महानोर आदींची उपस्थिती होती. प्रयास फाउंडेशन आणि आनंद प्रतिष्ठान बीड यांच्या वतीने चकलांबा जिल्हा परिषद शाळेत आयोजित या सामाजिक कार्याचे मुख्याध्यापक,शिक्षक ग्रामस्थ,उपस्थित होते.

# सामाजिक उपक्रमांद्वारे फडणवीस,मुंडे आणि ढाकणे यांचा वाढदिवस साजरा

पाथर्डी । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे केदारेश्वर साखर समुहाचे प्रमुख प्रताप ढाकणे यांच्या वाढदिवसानिमित्त देवनाथ फाऊंडेशनच्या वतीने जि.प.प्रा.शाळा मालेवाडी येथे ऊसतोडणी मजूर वाहतूक कामगारांच्या पाल्यांना शालेय साहित्य तसेच मिठाई वाटप करण्यात आले सामाजिक दायित्व या नात्याने वंचित घटकांसाठी उपयुक्त उपक्रम राबवित नेत्यांच्या जन्मदिनानिमित्त हा सेवाभावी कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचे प्रतिपादन संयोजक देवनाथ फाऊंडेशन प्रमुख डॉ.ज्ञानेश्वर दराडे यांनी केले याप्रसंगी विश्व हिंदू परिषद प्रखंडमंत्री गणेश जवरे उपसरपंच तुकाराम खेडकर कपिल बांगर युवा नेते मयुर काळुसे अविनाश जवरेअनिल जवरे महेश आव्हाड पंढरीनाथ खेडकर सोनु गिते



पांडुरंग जगताप आदि मान्यवर उपस्थित होते विद्यार्थ्यांना प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून संवाद साधत खेळीमेळीच्या वातावरणात तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा यानिमित्ताने मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला कार्यक्रमाचे प्रास्ताविक कमलाकर साडेगावकर तसेच स्वागत पुष्पा फुंदे व शंकर राजगुरू यांनी केले मालेवाडी जि.प.शाळा मुख्याध्यापक प्रदीप आंधळे यांनी आभार व्यक्त केले.

**तहसील कार्यालय, गेवराई ता. गेवराई जि.बीड**

**(दंड विभाग)**

**दुरध्वनीक्र. ०२४४७-२६२१४५**

e-mail.tahsildargeorai2@gmail.com

**क्रं.२०२६/दंड/कावि-**

**दिनांक २०.०७.२०२६**

**प्रती,**

**१ पोलीस निरीक्षक, पो. स्टे गेवराई / चकलांबा/तलवाडा**

**२. ग्राम महसूल अधिकारी गौंडगाव**

**विषयः-मृत्यू - नोंद आदेश मिळणे बाबत.**

संदर्भः-१. शासन निर्णय क्रमांक जम्रनों२५२५/ईऑ९९११८१)/प्र.क्र२२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५

२. पाटोळे दशरथ अभिमान रा. गौंडगाव ता. गेवराई जि. बीड यांचा अर्ज दिनांक ०८.०७.२०२६

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास सादर करण्यात येते की, प्रकरणात संदर्भ क्र ०२ नूसार पाटोळे दशरथ अभिमान रा. गौंडगाव ता. गेवराई जि.बीड यांनी अर्ज देवून अर्जदार यांची पत्नी शोभा दशरथ पाटोळे यांचा मृत्यू दिनांक १३.०९.२०२४ रोजी गौंडगाव येथे झाला असून अर्जदार यास कायदयाचे ज्ञान नसल्यामूळे मृत्यू नोंद करावयाचे राहून गेल्याने प्रकरणात जन्म आदेश मिळणे बाबत या कार्यालयास संदर्भीय अर्जाव्दारे विनंती करण्यात आलेली आहे.

करीता उकत अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक जम्रना२५२५/ईऑ९९११८१)/प्र.क्र२२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५ नूसार प्रकरणात पो.स्टे गेवराई यांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक जन्माचे ठीकाणचा व रहीवासीचा तपास करून पोलीस निरीक्षक यांनी चौकशी अहवाल सादर करावा, तसेच अर्जदाराचे स्थानीक रहीवासीचा स्थानीक चौकशी/पंचनामा मंडळ अधिकारी/ग्राम महसूल अधिकारी यांनी करून वस्तूस्थीतीदर्शक अहवाल सादर करण्यात यावे.

स्वाक्षरित

**तालूका दंडाधिकारी गेवराई**

# जंतर मंतर वरील आंदोलकावर अमानुष मारहाण करणाऱ्यावर गुन्हे दाखल करा

## जनक्रांती मोर्चाने राष्ट्रपती,पंतप्रधान गृहमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली मागणी

बीड । प्रतिनिधी

नवी दिल्ली येथील जंतर मंतर मैदानावरील आंदोलनातील विद्यार्थी, विशेषत: विद्यार्थिनी, महिला यांच्याशी अत्यंत अमानुषपणे, असंवैधानिक, अपमानास्पद, गैरवर्तन व मारहाण पोलिसांनी तसेच त्यांच्यासोबत पोलिसांच्या लाट्या घेऊन तैनात असलेल्या गुंडांनी केली आहे. हे हजारो व्हिडिओद्वारे जगाने पाहिले आहे. ही बाब लोकशाही व्यवस्थेला काळीमा आहे. आपण स्वतः पंतप्रधान जी आपला भारत देश मदर ऑफ डेमॉक्रसी असा उल्लेख करीत असताना ही लोकशाही केवळ कागदावरच आहे काय असा प्रश्न भारतीय नागरिकांना पडत आहे. लोकशाहीत पोलीस कायदा व सुव्यवस्थेचे रक्षक असतात, त्यांची निष्ठा राज्यघटनेशी असते हे भान सर्वांनाच असायला हवे.शिक्षण क्षेत्राचे खाजगीकरण, बाजारीकरण करून त्यामधून नफेखोरी व भ्रष्टाचार,पेपर फुटी,



निकालात घोटाळे, प्रवेश परीक्षेचे निकाल अति प्रलंबित ठेवणे. नियुक्त्या दिरंगाई करणे, गुणवंतांना डावलने, योग्य वेतनमान न देणे, बेरोजगारी,शिवाय घोटाळ्याचे उत्तरदायित्व नसणे, अशाश्वत जीवन , अदी गंभीर प्रश्न निर्माण झालेले आहेत. या सर्व बाबींचा साकल्याने, गांभीर्याने विचार करून आम्ही आपणास जनक्रांती मोर्चामार्फत पुढील मागण्या सादर करीत आहोत.

जंतर मंतर वरील आंदोलकावर, विद्यार्थ्यावर अमानुष मारहाण करणाऱ्या पोलिसांची निष्पक्ष सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीश यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करावेत, पोलिसांसोबतच्या गुंडांना लाठ्या कुणी दिल्या, त्यांना बेकायदेशीरपणे कुणी तैनात केले, याची जबाबदारी निश्चित करून संबंधित अधिकारी संबंधितांना निलंबित करून रीतसर चौकशी होऊन त्याच्यावर गुन्हे दाखल व्हावेत , शिक्षणाचे राष्ट्रीयकरण करून सर्वांना समान, मोफत ,दर्जेदार शिक्षण मिळावे, नवीन शैक्षणिक धोरण २०२० रद्द करावे.किमान प्राप्त लाखो आक्षेपांचा विचार करून घटनेनुसार योग्य बदल व्हावेत . एनटीए संस्था बरखास्त करावी.

तसेच एनटीएचे प्रमुख वादग्रस्त डॉ .प्रदीपकुमार जोशी यांना हटवून त्यांच्या जागी शिक्षणतज्ञ, सेवाजेष्ठ प्राध्यापकांची नियुक्ती लोकसेवा आयोगाच्या धर्तीवरच करण्यात यावी.

नीट २०२४ व २०२६ अगोदरच्या उच्चतम परीक्षा तसेच वर्ग ३, वर्ग ४ च्या परीक्षांमधील पेपर फुटी, परीक्षा थांबवणे, घोटाळे या बाबींची निष्पक्ष न्यायिक चौकशी करून उत्तरदायित्व निश्चित करून त्यांच्यावर गुन्हे दाखल व्हावेत आदी मागण्याचे निवेदन दिनांक २७ जुलै २०२६ सोमवार रोजी देशाच्या मा. महामहीम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू, सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधिश मा. जस्टीस सूर्यकांत, देशाचे मा.पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री मा. अमित शहा,तसेच राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री मा.देवेंद्र फडणवीस यांना जनक्रांती मोर्चाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय मार्फत पाठवलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनावर प्रा. सुशीला मोराळे,प्राचार्य डॉ. सविता शेटे,कॉ. नामदेव चव्हाण, डॉ. गणेश ढवळे, डॉ संजय तांदळे, दादासाहेब मुंडे, प्राचार्य डी.जी तांदळे, शेख शफीक, परवेझ कुरेशी,अशोक येडे,राजेंद्र आमटे,कॉ.सुहास जायभाये, बाजीराव ढाकणे, नितीन जायभाये,अमजद कुरेशी,किशोर कुलकर्णी, शेख युनूस, शेख पाशाभाई,कॉ. अभिषेक शिंदे,इलियास बागवान,अविनाश डरफे,नारायण शिंदे,साजेद कुरेशी, कॉ. इकबाल पेंटर, संगीता शिरसाट,विजय घेवारे, शेख अमर, हनुमान घोडके, शेख मूबीन आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
मंगळवार दि.२८ जुलै २०२६ | ६

# पशुसेवाच्या अनोख्या माध्यमातून ना. पंकजाताईचा वाढदिवस संजय आंधळेंनी केला साजरा -देशमुख

## ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त चिखलबीड येथे मोफत शेकडो पशुधनावर उपचार व चारा बियाण्यांचे वाटप

वडवणी । प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त कोणत्याही प्रकारची जाहिरातबाजी न करता समाजोपयोगी उपक्रमांद्वारे वाढदिवस साजरा करण्याचे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले होते. त्या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत वडवणी तालुक्यात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्याचाच एक भाग म्हणून चिखलबीड येथे सोमवारी (दि. २७ जुलै) भव्य पशुधन आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संजय आंधळे यांनी केले होते. या शिबिरात शेकडो शेतकऱ्यांनी आपल्या जनावरांसह सहभाग घेतला.






शिबिरामध्ये पशुशस्त्रक्रिया, लंपी रोगावरील प्रतिबंधात्मक लसीकरण, वंध्यत्व तपासणी व उपचार, विविध संसर्गजन्य व इतर आजारांचे निदान, मोफत औषधोपचार तसेच चारा बियाण्यांचे मोफत वाटप करण्यात आले. पशुसंवर्धन विभागाच्या तज्ज्ञ पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिवसभर जनावरांची तपासणी करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख म्हणाले की, ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यभर रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी, गरजूंना साहित्य वाटप, वृक्षारोपण अशा विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. चिखलबीड येथे भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय आंधळे यांनी पशुधन आरोग्य शिबिराचे उत्कृष्ट नियोजन केले आहे. माणूस आपले दुःख सांगू शकतो; मात्र मुक्या जनावरांना ते शक्य नसते. त्यामुळे अशा शिबिरातून जनावरांवर मोफत उपचार होणे ही मोठी सेवा असून या मुक्या जीवांचे आशीर्वाद निश्चितच ना. पंकजाताई मुंडे यांना लाभतील. ते पुढे म्हणाले की, पंकजाताई यांनी ग्रामविकास, महिला व बालविकास, जलसंधारण आणि आता पशुसंवर्धन या प्रत्येक खात्यात उल्लेखनीय काम केले आहे. जलयुक्त शिवार अभियानामुळे राज्यात जलसंधारणाची मोठी चळवळ उभी राहिली. गावोगावी बंधारे, जलसाठे आणि पाण्याची उपलब्धता वाढली. त्यामुळे दुष्काळी परिस्थितीतही टँकरची गरज अनेक भागांत कमी झाली. चिखलबीड येथील पशुवैद्यकीय दवाखान्याचे अपूर्ण काम लवकर पूर्ण करून तो सुरू करण्यासाठी ना. पंकजाताई मुंडे यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येईल असे मत जिल्हाध्यक्ष देशमुख यांनी व्यक्त केले. तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात माजी आमदार केशवराव आंधळे म्हणाले की, ना. पंकजाताई मुंडे या मुंडे साहेबांच्या पावलावर पाऊल ठेवून काम करत आहेत. शेतकरी, महिला, युवक आणि ग्रामीण भागाच्या विकासासाठी त्यांनी अनेक लोकहिताच्या ◀◀ पान ३ वर

### रुई (पिंपळा) येथे ५००० वृक्षांची लागवड

ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त रुई (पिंपळा) येथे पाच वाजता जिल्हाध्यक्ष संजय आंधळे यांच्या माध्यमातून सेवा, पर्यावरण आणि ग्रामविकास यांचा संगम घडवून आणणारे उपक्रम राबविण्यात आले. घनवन पद्धतीने तब्बल ५ हजार वृक्षांची लागवड करून हरित भविष्यासाठी भक्कम पायाभरणी करण्यात आली. ग्रामसुरक्षेला अधिक बळकटी देण्यासाठी गावातील प्रमुख ठिकाणी अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून, त्याचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते झाले. आदर्श सरपंच मयूर आंधळे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या पुढाकारातून राबविण्यात आलेले हे उपक्रम 'हरित, सुरक्षित आणि आदर्श गाव' आदर्श गाव असल्याचे मान्यवरांनी भावना व्यक्त केली.

# मारहाण प्रकरणी एकाच कुटुंबातील तिघांना सहा महिने कारावास व दंड

### गेवराई न्यायालयात ऐतिहासिक निकाल

गेवराई । प्रतिनिधी

येथील मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाने एका गंभीर मारहाण व दमदाटीच्या खटल्यात महत्त्वपूर्ण निकाल देत एकाच कुटुंबातील तिन्ही आरोपींना सहा महिने कारावास व आर्थिक दंडाची शिक्षा सुनावली आहे. मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी श्री. आर. ए. मिसाळ यांनी हा निकाल दिला आहे.

पोलीस ठाणे गेवराई गुन्ह्याचे नोंद क्रमांक २४३/२०१६ नुसार, भारतीय दंड संहितेच्या कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये गुन्हा दाखल होता. या प्रकरणातील आरोपी १) रमेश किसनराव सूर्यवंशी (वय ५० वर्षे), २) शोभा रमेश सूर्यवंशी (वय ४२ वर्षे) आणि ३) सुरज रमेश सूर्यवंशी (सर्व रा. जायकवाडी कॅम्प बांगपिंपळगाव, ता. गेवराई, जि. बीड) यांना न्यायालयाने दोषी ठरवले. न्यायालयाने त्यांना कलम ३२४ अन्वये ६ महिने कारावास व प्रत्येकी २,०००/- दंड आणि कलम ५०६ अन्वये प्रत्येकी ३ महिने कारावास व २,०००/- दंडाची शिक्षा सुनावली आहे.

सदर गुन्ह्याचा तपास तत्कालीन तपास अंमलदार पोह/६१५ घाणे यांनी केला होता, तर न्यायालयात सरकारतर्फे कामकाज ड. एस. के. माने यांनी पाहिले. पोलीस अधीक्षक मा. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक मा. समीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनिल कटके आणि पोलीस निरीक्षक श्री. किशोर पवार यांच्या निगराणीखाली कोर्टातील केसेसचा नियमित आढावा घेतला जात आहे. या खटल्यात कोर्ट कामकाज पोह/१३४३ विठ्ठल दगडू मेहेत्रे यांनी पार पाडले.

# आष्टीचे कार्यकारी अभियंता व उपविभागीय अभियंत्याचा बीडमधूनच कारभार?

## अधिकारी-कर्मचारी कार्यालयात नियमित नसल्याचा आरोप; सामाजिक कार्यकर्त्यांचे मुख्य अभियंत्यांकडे निवेदन

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी येथील सार्वजनिक बांधकाम विभाग (क्र.२) कार्यकारी अभियंता कार्यालय तसेच सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी नियमितपणे कार्यालयात उपस्थित राहत नसल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते रामभाऊ खाडे यांनी केला आहे. याबाबत त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे निवेदन सादर करून चौकशीची मागणी केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, सार्वजनिक बांधकाम विभाग (क्र.२) चे कार्यकारी अभियंता कार्यालय नुकतेच बीड येथून आष्टी येथे स्थलांतरित करण्यात आले आहे. मात्र, कार्यालय आष्टीत सुरू झाल्यानंतरही अनेक अधिकारी बीड येथूनच कारभार पाहत असल्याचा आरोप आहे. त्यामुळे विविध कामांसाठी कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना अधिकाऱ्यांची भेट होत नसून त्यांची मोठी गैरसोय होत आहे.

आष्टी येथील शासकीय विश्रामगृह परिसरात कार्यकारी अभियंता कार्यालय आणि सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालय एकाच ठिकाणी कार्यरत आहेत. उपविभागीय अभियंता कृष्णा पानसंबळ यांच्याकडेच कार्यकारी अभियंता पदाचा अतिरिक्त कार्यभार असल्याने प्रशासकीय नियंत्रणाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

सध्या आष्टी तालुक्यात विविध रस्त्यांची विकासकामे सुरू असतानाही संबंधित अधिकारी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी न जाता बीड येथूनच देखरेख करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. बहुतांश अधिकारी व कर्मचारी बीड येथे वास्तव्यास असल्याने तेथूनच ये-जा करत असल्याचेही निवेदनात म्हटले आहे.

सन २०२५ मधील अतिवृष्टीमुळे तालुक्यातील अनेक रस्ते आणि नदीवरील कमी उंचीचे पूल पाण्याखाली जाऊन वाहतूक अनेक दिवस ठप्प झाली होती. त्या पार्श्वभूमीवर आवश्यक ठिकाणी नवीन पुलांची कामे हाती घेणे गरजेचे असताना प्राधान्यक्रमाऐवजी इतर रस्त्यांची कामे मंजूर करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. तसेच कार्यकारी अभियंता व उपविभागीय अभियंता कार्यालयात अधिकारी-कर्मचारी नियमित उपस्थित राहत नसून केवळ शिपाई कार्यालय उघडणे व बंद करण्याचे काम करतात. अभियंते प्रत्यक्ष कामांच्या ठिकाणी न जाता कागदोपत्री कामे व बिले नोंदवित असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. या सर्व प्रकाराची सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने चौकशी करून कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती नियमित करावी, नागरिकांना वेळेत सेवा उपलब्ध करून द्यावी तसेच कामकाजात पारदर्शकता आणावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# छत्रपती संभाजीनगरात राज रायते यांच्या गीतांनी रंगला समाज संघटन मेळावा !

## तेली सेनातर्फे विशेष सत्कार; गुणवंत विद्यार्थ्यांना दिली प्रेरणेची साद

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

संगीताच्या माध्यमातून समाजप्रबोधन करणारे आणि आपल्या सुमधुर आवाजाने महाराष्ट्रभर लोकप्रिय असलेले समाजभूषण गायक राज प्रल्हाद रायते यांनी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित तेली सेना महाराष्ट्राच्या राज्यस्तरीय समाज संघटन मेळाव्यात आपल्या प्रभावी गायनाने उपस्थितांची मने जिंकली.

तेली सेना महाराष्ट्रतर्फे रविवार (दि. २६ जुलै २०२६) रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे






'राज्यस्तरीय गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ व समाज संघटन मेळावा २०२६' आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी तेली सेना महाराष्ट्रचे संस्थापक अध्यक्ष गणेश पवार यांच्या निमंत्रणावरून राज रायते यांनी विशेष उपस्थिती लावली. यावेळी राज रायते यांनी तेली समाजाच्या आराध्य दैवतांच्या जीवनचरित्रावर आधारित प्रेरणादायी गीत सादर केले. त्यांच्या सुमधुर गायनाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. गीतातून समाजप्रबोधन, एकात्मता आणि संघटनाचा संदेश देत त्यांनी उपस्थितांना प्रेरित केले. कार्यक्रमादरम्यान तेली सेना महाराष्ट्राच्या वतीने राज रायते यांचा विशेष सत्कार करण्यात आला. समाजासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची ◀◀ पान ३ वर

# अंबाजोगाईत शेकडो मोकाट कुत्र्यांचा संशयास्पद मृत्यू! दोषीवर गुन्हा दाखल करण्याची लोमटे यांची मागणी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मोकाट कुत्र्यांची समस्या सोडवण्याऐवजी अंबाजोगाई नगर परिषदेने थेट त्यांचा खूनच केला का? असा संतप्त सवाल आता शहरभर विचारला जात आहे. नगर परिषदेच्या ताब्यातील शेकडो मोकाट कुत्र्यांचे मृतदेह शहरातील सर्वे नंबर १७ कचरा डेपोमध्ये ढीग करून टाकलेले आढळून आल्याने सर्वत्र खळबळ उडाली आहे .

नागरिकांच्या तक्रारीनंतर शहरातील मोकाट कुत्रे पकडण्यात आले त्यांना सांभाळणे आणि लसीकरणासाठी लाखो रुपयांचे टेंडर देखील काढण्यात आले. पण सुविधा देण्याऐवजी त्या निरपराध जीवांचा घात करण्यात आला, असा आरोप होत असून

या प्रकरणी काँग्रेसचे अंबाजोगाई तालुकाध्यक्ष अभिजीत लोमटे यांनी जिल्हाधिकारी, पोलीस निरीक्षक, मुख्याधिकारी आणि -थइख यांना ईमेलद्वारे लेखी तक्रार दाखल केली असून सखोल चौकशीची मागणी केली आहे.

मोकाट कुत्र्यांना सांभाळणे व लसीकरणासाठी नगर परिषदेने लाखो रुपयांचे टेंडर काढले आहे. पैसे उचलूनही त्यांना सुविधा न देता त्यांचा खून करणे हे गंभीर आहे. हा मृत्यू नैसर्गिक नसून जाणीवपूर्वक विषबाधा केल्याचा संशय आहे.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाला धुडकावून शेकडो कुत्र्यांचा खून करणाऱ्या मुख्याधिकारी आणि पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांवर इछड ३२५ व प्राणी क्रूरता कायदा १९६० कलम ११(१) नुसार गुन्हा दाखल झाला पाहिजे. या प्रकरणात सत्ताधारी राजकारणी यांचा हस्तक्षेप असून हे प्रकरण दाबण्यासाठी सर्वोत्तपरी प्रयत्न केले जात असून पुरावे नष्ट केले जाऊ शकतात संबंधितावर तत्काळ गुन्हे दाखल करावे अन्यथा आम्ही लोकशाही मार्गाने उपोषणाला बसू. या खुनाला जबाबदार प्रत्येकावर कारवाई झाल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही. असा इशारा लोमटे यांनी दिला आहे.

मुख्याधिकारी,पशुवैद्यकीय अधिकारी, संबंधित टेंडर धारक व संबंधित कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा. ◀◀ पान ३ वर

# मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिराचा डोंगरकिन्ही गटातील नागरिकांनी लाभ घ्यावा - ॲड. प्रकाश कवठेकर

बीड । प्रतिनिधी

आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघातील नागरिकांसाठी लोकनेते आमदार सुरेश अण्णा धस यांच्या पुढाकारातून, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष तसेच जिल्हा प्रशासन, बीड यांच्या समन्वयाने मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्रभाऊ फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त या आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, डोंगरकिन्ही गटातील नागरिकांनी या शिबिराचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन ड. प्रकाश कवठेकर यांनी केले आहे.



हे शिबिर दि. ६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत अनिषा ग्लोबल स्कूल ग्राउंड, जामगाव रोड, आष्टी, जि. बीड येथे होणार आहे. शिबिरामध्ये विविध आजारांसाठी तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत तपासणी, निदान व मार्गदर्शन करण्यात येणार आहे. यामध्ये हृदयरोग, किडनी विकार, कर्करोग, अस्थिविकार, स्त्रीरोग, बालरोग, नेत्रविकार, त्वचारोग, दंतरोग, नाक-कान-घसा, जनरल मेडिसिन, जनरल सर्जरी, मानसिक आरोग्य, फिजिओथेरपी, आयुर्वेदिक व होमिओपॅथी आदी विभागांचा समावेश आहे. तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना व महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत ◀◀ पान ३ वर

# श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे बुधवार रोजी पांडुरंग महाराज उगले यांचे कीर्तन

**बीड । प्रतिनिधी**

विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या २८ व्या वर्षातील बाराव्या पुण्यतिथी आषाढ शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प. पांडुरंग महाराज उगले बीड यांचे बुधवार दिनांक २९ जुलै २०२६ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे अवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य



शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व समस्त गावकरी मंडळी बकरवाडी ता.जि.बीड यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल. व गुरुपौर्णिमेच्या निमित्त ज्यांना बाबांकडून गुरु मंत्र घ्यायचा आहे त्यांना गुरू मंत्र सकाळी ७ ते ८ व दुपारी २ ते ५ यावेळी देण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी ही विनंती.

# माजलगांव तहसील कार्यालयासमोर रिपाइं (आठवले)चे महाधरणे आंदोलन

माजलगांव । प्रतिनिधी

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) माजलगांव तालुक्याच्या वतीने दि. २७ जुलै रोजी सकाळी ११ वाजता माजलगांव तहसील कार्यालयासमोर अनुसूचित जातीच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या विरोधात महाधरणे आंदोलन करण्यात आले. शासनाने अनुसूचित जातीच्या आरक्षणामध्ये करण्यात आलेले उपवर्गीकरण तातडीने रद्द करावे, अशी प्रमुख मागणी यावेळी करण्यात आली.




या आंदोलनाचे नेतृत्व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)चे तालुकाध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष अविनाश जावळे यांनी केले. आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी शासनाच्या धोरणाविरोधात जोरदार घोषणाबाजी करत सामाजिक न्यायाच्या तत्त्वाला बाधा पोहोचेल, असा आरोप केला.यावेळी बोलताना अविनाश जावळे म्हणाले की, अनुसूचित जातीच्या आरक्षणातील उपवर्गीकरणामुळे समाजात फूट पडण्याची शक्यता असून, भारतीय संविधानाने दिलेल्या समान न्यायाच्या तत्त्वालाही धक्का बसू शकतो. त्यामुळे केंद्र व राज्य शासनाने ◀◀ पान ३ वर

# माहिती दडपून भ्रष्टाचार लपविण्याचा आरोप

## मुख्याधिकाऱ्यांच्या निषेधार्थ राकेश साळवेंचे आमरण उपोषणावर; पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्या कार्यकर्त्यांसह नगर परिषदेसमोर आंदोलन

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव नगर परिषदेकडून विविध विषयांशी संबंधित मागितलेली माहिती वारंवार अर्ज करूनही उपलब्ध करून दिली जात नसून, माहिती देण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ करून नगर परिषदेमधील कथित भ्रष्टाचारावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा गंभीर आरोप पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे तालुकाध्यक्ष राकेश साळवे यांनी केला आहे. या कथित दिरंगाईच्या निषेधार्थ राकेश साळवे व सिद्धार्थ ससाणे यांच्यासह कार्यकर्त्यांनी सोमवार, २७ जुलै रोजी सकाळी ११ वाजता माजलगाव नगर परिषद कार्यालयासमोर आमरण उपोषणास सुरुवात केली आहे.

राकेश साळवे यांनी प्रशासनाला दिलेल्या निवेदनात नगर परिषद प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. नगर परिषदेकडील विविध विषयांशी संबंधित कागदपत्रे, नोंदी, आदेश व इतर आवश्यक माहिती मिळावी यासाठी अनेक वेळा अर्ज करण्यात आले. मात्र संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून माहिती देण्याऐवजी वेळकाढूपणाची भूमिका घेतली जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. मागितलेली माहिती उपलब्ध करून न दिल्यामुळे नगर परिषद प्रशासनाच्या पारदर्शकतेवर तसेच कारभारावर संशय निर्माण होत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

**आश्वासनानंतरही माहिती न मिळाल्याचा आरोप**




### मागितलेली माहिती तात्काळ देण्याची मागणी

या प्रकरणी यापूर्वी २० जून रोजी आमरण उपोषण करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यावेळी नगर परिषद प्रशासनाकडून मागितलेली माहिती उपलब्ध करून देण्याचे आश्वासन देण्यात आल्याने प्रशासनाच्या विनंतीवरून उपोषण पुढे ढकलण्यात आले होते. मात्र त्यानंतरही अपेक्षित असलेली संपूर्ण माहिती उपलब्ध करून देण्यात आली नसल्याचा आरोप राकेश साळवे यांनी केला आहे. ◀◀ पान ३ वर

### आंदोलनाकडे शहराचे लक्ष

नगर परिषद कार्यालयासमोर सुरू झालेल्या या आमरण उपोषणामुळे माजलगाव शहरातील राजकीय व सामाजिक वातावरणात चर्चेला उधाण आले आहे. विविध सामाजिक संघटना व नागरिकांकडून आंदोलनाला पाठिंबा व्यक्त केला जात असल्याचा दावा आंदोलकांकडून करण्यात आला आहे. नगर परिषदेमधील कारभार, माहिती उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया आणि पारदर्शकतेचा मुद्दा ऐरणीवर आल्याने या आंदोलनाकडे राजकीय वर्तुळाचेही लक्ष लागले आहे. मागितलेली माहिती प्रत्यक्षात कधी उपलब्ध करून दिली जाणार, प्रशासन आंदोलकांशी चर्चा करणार का आणि उपोषणावर तोडगा निघणार का, याकडे आता माजलगावकरांचे लक्ष लागले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26